
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १६८
www.ramprahar.com
गुरुवार, ४ जानेवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

सरपंच मंगेश शेलार यांच्या पुढाकाराने करंजाडेत विकास/३
'सोशल मीडियाचा वापर सांभाळून करावा'/५
अलिबाग-मुरूडच्या कराटेपटूंनी इंटरनॅशनल कप जिंकला/८

## इराणमध्ये भीषण बॉम्बस्फोट; १०३ जण ठार



**तेहरान :** इराणचे दिवंगत जनरल कासेम सुलेमानी यांच्या हत्येच्या चौथ्या स्मृतीदिनानिमित्त बुधवारी (दि.३) आयोजित कार्यक्रमात एकापाठोपाठ दोन भीषण बॉम्बस्फोट झाले. या स्फोटांमध्ये किमान १०३ ठार आणि १७० जण जखमी झाले आहेत. हा दहशतवादी हल्ल्या असल्याचे मानले जात आहे. मंगळवारीच बैरूत येथील ड्रोन हल्ल्यात इराण समर्थक हमासचा बंडखोर सालेह अल-अरुरी मारला गेला होता. यामुळे मध्यपूर्वेत तणाव वाढला होता. हा हल्ला इस्रायलने घडवून आणल्याचा आरोप लेबनीज अधिकाऱ्यांनी केला होता. यानंतर बुधवारी इराणचे दिवंगत जनरल कासेम सुलेमानी यांचे मूळ गाव केरमानमधील साहेब अल-जमान मशिदीजवळ स्फोट झाले. अमेरिकन ड्रोन हल्ल्यात सुलेमानी यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या मृत्यूच्या स्मृतीदिनानिमित्त समर्थक एकत्र आले असताना हे स्फोट झाले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते १२ जानेवारीला शिवडी-न्हावा सी लिंकचे उद्घाटन

## ■ ५० हजारांपेक्षा जास्त नागरिकांची असणार उपस्थिती; नियोजन बैठकीतून आढावा

पनवेल : रामप्रहर वृत्त

**देशाचे लोकप्रिय व यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १२ जानेवारीला अटल सेतू अर्थात शिवडी-न्हावा सी लिंक या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे उद्घाटन होणार आहे. या वेळी होणाऱ्या कार्यक्रमास ५० हजारांपेक्षा जास्त नागरिक उपस्थित राहणार आहेत. त्या अनुषंगाने उलवे नोड येथे राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि.२) नियोजन आढावा बैठक पार पडली.**




रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये झालेल्या या बैठकीस माजी खासदार डॉ. संजीव नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, माजी आमदार धैर्यशील पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, ग्रामीण जिल्हाध्यक्ष मोहपे, कल्याण जिल्हाध्यक्ष नरेंद्र सूर्यवंशी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, माजी महापौर कविता चौतमोल, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहराध्यक्ष कौशिक शहा, खालापूर तालुकाध्यक्ष प्रवीण मोरे, खोपोली शहराध्यक्ष रमेश रेटरेकर, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, बेलापूर विधानसभा संयोजक निलेश म्हात्रे, ठाणे संघटनमंत्री हेमंत म्हात्रे, राजेश मपारा, मिलिंद पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांच्यासह पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते उपस्थित होते. **(पान २ वर..)**

# महायुतीतर्फे १४ जानेवारीला राज्यभर मेळावे

## लोकसभेच्या ४५पेक्षा अधिक जागा जिंकण्याचा निर्धार

**मुंबई :** प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुतीतील ११ घटक पक्षांचे १४ जानेवारी रोजी राज्यभर जिल्हावार मेळावे होणार असल्याची घोषणा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी (दि.३) केली. महायुतीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

शिवसेना नेते आणि मंत्री दादा भुसे, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, मुंबई अध्यक्ष समीर भुजबळ, भाजप प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये या वेळी उपस्थित होते. लोकसभा निवडणुकीत महायुतीला ५१ टक्के मतांसह ४५पेक्षा अधिक जागा मिळतील, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला.

प्रदेशाध्यक्ष बावनकुळे म्हणाले की, मकरसंक्रांतीच्या पर्वावर १४ जानेवारी रोजी राज्यातील ३६ जिल्ह्यांत ११ पक्षांचे संयुक्त मेळावे होणार आहेत. जिल्हा मेळाव्यांना घटकपक्षांचे जिल्हा पातळीवरील प्रमुख नेते, पालकमंत्री तसेच घटकपक्षांनी नेमलेले संपर्कमंत्री उपस्थित राहणार आहेत. जिल्हास्तरीय मेळाव्यानंतर तालुका आणि बूथस्तरीय मेळावे घेण्याचा निर्णय महायुतीने घेतला आहे. **(पान २ वर..)**



### सर्व नेते व कार्यकर्त्यांची एकजूट -खा. सुनील तटकरे

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले की, लोकसभा निवडणुकीत भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना यांच्यासह महायुतीतील सर्व घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांतील समन्वय वाढावा यासाठी हे मेळावे होणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकसित भारत साकारण्यासाठी महायुतीचे सर्व नेते आणि कार्यकर्ते एकजुटीने कामाला लागले आहेत.

**केंद्रातील मोदी सरकारप्रमाणेच राज्यातील एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने अनेक विकासकामे केली आहेत. ही विकासकामे तळागाळातील जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी महायुतीच्या घटक पक्षांचे मेळावे होणार आहेत. गावपातळीपर्यंतच्या कार्यकर्त्यांमध्ये अधिक समन्वय निर्माण होण्यासाठी या मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे.**
**-ना. दादा भुसे, शिवसेना नेते**

# १४ जानेवारीला 'नमो' खारघर मॅरेथॉन

**खारघर :** रामप्रहर वृत्त

रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्टस कॉम्प्लेक्स आणि खारघर रेसिडन्स वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'नमो चषक' अंतर्गत रविवारी (दि.१४) 'एक धाव महिला नेतृत्वाखालील विकासासाठी' हे महिलांप्रती आदरभावना अधोरेखित करणारे घोषवाक्य घेऊन नमो खारघर मॅरेथॉन २०२४ ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने घेतलेली आंतरराष्ट्रीय भरारी व देशाच्या झालेल्या विकासाबद्दल आदरभावना व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष कार्यकारिणीने दिलेल्या निर्देशानुसार संपूर्ण महाराष्ट्रात नमो चषक स्पर्धा होणार आहे. त्या अनुषंगाने पनवेल विधानसभा क्षेत्रात विविध कला व क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जाणार आहेत. या अंतर्गत खारघर मॅरेथॉन, क्रिकेट, कुस्ती, कबड्डी, सायक्लोथॉन, कॅरम, बुद्धिबळ या क्रीडा स्पर्धा तसेच नृत्य, चित्रकला, गायन, वक्तृत्व या कला स्पर्धांचेसुद्धा आयोजन करण्यात येत आहे. नमो चषक अंतर्गत या स्पर्धांमुळे युवा पिढीला कला व क्रीडा क्षेत्राकडे आकृष्ट करता येणार असून पनवेल विधानसभा क्षेत्रात २५ हजारपेक्षा जास्त स्पर्धकांना सहभागी करण्याचे उद्दिष्ट आमदार प्रशांत ठाकूर यांनी ठेवले आहे. **(पान २ वर..)**




### सहभागासाठी इथे करा संपर्क

स्पर्धेत सहभाग घेण्याची अंतिम तारीख ६ जानेवारी असून चेस्ट नंबर १० जानेवारीपर्यंत स्पर्धकांनी घेऊन जाणे अनिवार्य आहे. स्पर्धेची नाव नोंदणी www.khargharmarathon.in या संकेतस्थळावर तसेच बारकोड ऑनलाईन पद्धतीने करता येणार आहे. अधिक माहितीसाठी ०२२२७७४४४१०, ०२२२७७४४५७७, ०२२६८५७४४०१, ०२२६८५७४४०२, ०२२६८५७४४०७, ८८९८७७७७११ किंवा ८०९७६८४६६४ या क्रमांकावर संपर्क साधावा आणि या स्पर्धेचा जास्तीत जास्त स्पर्धक, क्रीडारसिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन स्पर्धा प्रमुख व महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केले आहे.

### गटनिहाय बक्षिसे

- *पुरुष खुला गट (फक्त रायगड जिल्हा) अंतर १० किलोमीटर : प्रथम क्रमांक २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक १५ हजार रुपये, तृतीय क्रमांक १० हजार रुपये, उत्तेजनार्थ सात स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये तसेच सर्व विजेत्यांना ट्रॅक सूट.*
- *महिला खुला गट (फक्त रायगड जिल्हा) अंतर १० किलोमीटर : प्रथम क्रमांक २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक १५ हजार रुपये, तृतीय क्रमांक १० हजार रुपये, उत्तेजनार्थ सात स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये तसेच सर्व विजेत्यांना ट्रॅक सूट.*
- *१७ वर्षाखालील मुले गट (फक्त रायगड जिल्हा) अंतर पाच किलोमीटर : प्रथम क्रमांक पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांक तीन हजार रुपये, तृतीय क्रमांक दोन हजार रुपये तसेच उत्तेजनार्थ १० स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये.*
- *१७ वर्षाखालील मुली गट (फक्त रायगड जिल्हा) अंतर पाच किलोमीटर प्रथम क्रमांक : पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांक तीन हजार रुपये, तृतीय क्रमांक दोन हजार रुपये तसेच उत्तेजनार्थ १० स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये.*
- *१४ वर्षाखालील मुले गट (फक्त रायगड जिल्हा) अंतर पाच किलोमीटर : प्रथम क्रमांक पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांक तीन हजार रुपये, तृतीय क्रमांक दोन हजार रुपये तसेच उत्तेजनार्थ १० स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये.*
- *१४ वर्षाखालील मुली गट (फक्त रायगड जिल्हा) अंतर पाच किलोमीटर : प्रथम क्रमांक पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांक तीन हजार रुपये, तृतीय क्रमांक दोन हजार रुपये तसेच उत्तेजनार्थ १० स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये.*
- *विशेष आकर्षण खारघर दौड - अंतर तीन किलोमीटर : स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला आकर्षक मेडल*
- *सिनिअर सिटीझन दौड - अंतर दोन किलोमीटर : प्रथम क्रमांक पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांक तीन हजार रुपये, तृतीय क्रमांक दोन हजार रुपये तसेच उत्तेजनार्थ सात स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये.*

## निवडक

### प्रभू श्रीरामाविषयी आमदार आव्हाड यांचे वादग्रस्त विधान

**शिर्डी :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष खासदार शरद पवार गटाच्या शिर्डी येथील शिबिरात बुधवारी (दि. ३) बोलताना माजी मंत्री तथा आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रभू श्रीरामाविषयी वादग्रस्त विधान केले. 'राम बहुजनांचा आहे. तो शिकार करून मांसाहार करीत होता. १४ वर्षे वनवासात राहणारा माणूस शाकाहारी अन्न कुठे शोधणार?', असा प्रश्न करीत आव्हाड यांनी नेहमीप्रमाणे अजब दावा केला.

### मयत भाजप नेत्या सना खान यांचा मोबाईल, लॅपटॉप सापडला

**नागपूर :** भाजप नेत्या सना खान हत्याकांडाला नवीन वळण मिळाले असून त्यांचा मोबाईल आणि लॅपटॉप पोलिसांना सापडला आहे. पोलिसांनी मुख्य आरोपी अमित साहू याच्या आईच्या घरावर छापा मारल्यानंतर पोलिसांच्या हाती नवे पुरावे लागले आहेत. सना यांच्या मोबाईलमधून पुरावे गोळा करण्यासाठी सायबर तज्ज्ञांची मदत पोलीस घेत आहेत.

# पोलादपूरचा तरुण नौदलात 'अग्निवीर'



(छाया : शैलेश पालकर)

**पोलादपूर :** प्रतिनिधी

पोलादपूर तालुक्यातील साखर गावचा तरुण व श्री शिवकृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट संचलित शंकरराव गोपाळराव महाडिक इंग्लिश मीडियम स्कूलचा माजी विद्यार्थी ऋषभ राजेश सुतार याची भारतीय नौदलात नौसैनिक म्हणून 'अग्निवीर'तर्फे निवड झाली आहे.

ऋषभ सुतार याने आधी पोलादपूर व नंतर लोणेरे (ता. माणगाव) येथील डॉ.आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठामध्ये पुढील शिक्षण घेतले. 'अग्निवीर'च्या माध्यमातून ऋषभचे पुढील प्रशिक्षण ओडिशामध्ये होणार आहे. याबद्दल शाळेचे संस्थापक शंकरराव महाडिक, अध्यक्ष मंगला महाडिक, उपाध्यक्ष बाबुराव महाडिक, मनोज महाडिक, मुख्याध्यापिका प्रतिभा उतेकर व शिक्षकांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### पनवेल-कर्जत रेल्वेमार्गाला हिरवा कंदिल

**मुंबई :** प्रतिनिधी

पनवेल-कर्जत मार्गावरील लोकलच्या मार्गाला उच्च न्यायालयाने हिरवा कंदिल दाखवला आहे. नवीन रेल्वे मार्गिका सुरू झाल्यावर प्रवाशांच्या वेळेची बचत होणार आहे.

पनवेल-कर्जत लोकलसाठी दोन नवीन रूळ टाकले जात आहेत, पण रेल्वे रूळांमुळे खालापूर येथील एका शाळेला धोका होण्याची शक्यता होती. त्यामुळे या शाळेने कोर्टात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर खंडपीठासमोर सुनावणी झाली. रेल्वे अधिकारी आणि शाळा प्रशासनाने संयुक्तपणे जागेची पाहणी केली. शाळेजवळ रेल्वे रूळ कशा पद्धतीने बांधता येईल याचा एक आराखडा रेल्वेने सादर केला आहे. त्यानुसार येथे १० फूट उंच भिंत उभारली जात आहे. यानंतर शाळेने कामास संमती दिली आहे.

# शुक्रवारपासून रसायनी युथ फेस्टिव्हल

## कला, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

**रसायनी :** रामप्रहर वृत्त

आमदार महेश बालदी मित्र मंडळ रसायनी विभागाच्या वतीने ५ ते १४ जानेवारीपर्यंत मोहोपाडा येथील भव्य मैदानावर रसायनी कला, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव अर्थात रसायनी युथ फेस्टिव्हल २०२४चे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन उरण विधापनभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते ५ जानेवारीला सायंकाळी ५ वाजता होणार आहे. या महोत्सवाच्या अनुषंगाने विविध कला, क्रीडा व सांस्कृतिक अशा भरगच्च कार्यक्रमांची मेजवानी दर्शकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.




५ जानेवारीला आमदार श्री २०२४ शरीरसौष्ठव स्पर्धा, ६ जानेवारीला दर्या आमची दौलत हे आगरी कोळी नृत्य, ७ जानेवारीला भोजपुरी व हिंदी नृत्य, ८ जानेवारीला 'महाराष्ट्राची लोकधारा', ९ जानेवारीला हळदी कुंकू व चला जिंकूया पैठणी कार्यक्रम, १० जानेवारीला 'बेबी अँन्ड मास्टर रसायनी', ११ जानेवारीला लावणी शो, १२ जानेवारीला रसायनी आयडॉल गायन स्पर्धा, १३ जानेवारीला नृत्य स्पर्धा, तर १४ जानेवारीला समारोपाच्या दिवशी मिस अँण्ड मास्टर रसायनी फॅशन शो असे विविध कार्यक्रम होणार आहेत.

आमदार महेश बालदी हे कला, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रमांना आणि या क्षेत्रातील कलाकारांना नेहमीच प्रोत्साहन देत असतात. आता त्यांच्या माध्यमातून मोहोपाडा येथील भव्य मैदानावर रसायनी कला, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव अर्थात रसायनी युथ फेस्टिव्हल २०२४चे आयोजन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी संदीप म्हात्रे (७७३८१३७०३७), पल्लवी दाते (९१८३१६५६७६), साजन जाधव (९१७५८०२४६६) किंवा प्रमोद कनोजिया (८६००४०९४३९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




**पनवेल : भारतीय जनता पक्ष उत्तर रायगड जिल्ह्याच्या वतीने मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसिद्ध करण्यात आलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, माजी आमदार धैर्यशील पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या वेळी ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, ग्रामीण जिल्हाध्यक्ष मोहपे, कल्याण जिल्हाध्यक्ष नरेंद्र सूर्यवंशी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष अनिल भगत, उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत आदी उपस्थित होते.**

### कॅबिनेट मंत्री लोढा यांची तरुणांना नववर्ष भेट

# महाराष्ट्रात १०० कौशल्य विकास केंद्र होणार स्थापन

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे कौशल्य रोजगार उद्योजकता आणि नाविन्यतामंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या प्रयत्नांतून कौशल्य संपन्न महाराष्ट्राच्या दिशेने महायुती सरकारने नवीन वर्षात आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले. १५ ते ४५ वयोगटातील व्यक्तींना रोजगारक्षम बनवण्यासाठी कौशल्य विकास सोसायटीमार्फत प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाची अंमलबजावणी केली जाणार आहेत. याद्वारे महाराष्ट्रातील १०० महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र सुरू केली जाणार आहेत.

कौशल्य विकास ग्रामीण भागात केंद्रित असावा हे कॅबिनेट मंत्री लोढा यांचे उद्दिष्ट होते. त्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भारतात प्रथमच ५११ कौशल्य विकास केंद्रांचे एकाच वेळी उद्घाटन करण्यात आले. या कौशल्य विकास केंद्रांमार्फत गावातील नागरिकांना रोजगार कमावण्याची, नवे कौशल्य शिकण्याची समान संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे, जेणेकरून रोजगारासाठी गावातून शहराकडे होणारे स्थलांतर कमी होईल.



त्याचप्रमाणे आता येत्या नवीन वर्षातही सुरू होणाऱ्या १०० कौशल्य विकास केंद्रांमुळे महाराष्ट्राची कौशल्य संपन्न पिढी तयार करणे अधिक जलद गतीने होणार आहे. या केंद्रांद्वारे रोजगारासाठी आवश्यक अभ्यासक्रम निवडण्याचे स्वातंत्र्य महाविद्यालयांचे असेल आणि हे अभ्यासक्रम National Skill Qualification Framework शी सुसंगत असतील. त्यासाठी केंद्र शासनातर्फे निश्चित केलेल्या Common Cost Norms नुसार प्रशिक्षण शुल्क देण्यात येईल.

कौशल्य विकास प्रशिक्षण हा भारतातील युवकांच्या जीवनात नवी पहाट आणेल. विकसित भारत घडवण्यात या प्रशिक्षणाची महत्त्वपूर्ण भूमिका राहिल. त्या दृष्टीने कौशल्य केंद्रांचे निर्माण कार्य आणि आपल्या तरुण पिढीला रोजगारक्षम बनवण्यासाठी तरुण पिढीला कौशल्य प्रशिक्षणाकडे वळवणे अतिशय महत्त्वाचे राहणार आहे.

## शासन आपल्या दारी कार्यक्रमाच्या अनुषंगाने वाहतुकीमध्ये बदल

**अलिबाग : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील लोणेरे येथे होणाऱ्या शासन आपल्या दारी कार्यक्रमासाठी मुंबई–गोवा महामार्गावरील अवजड वाहतूक शुक्रवारी (दि. ५) बंद ठेवण्यात आली आहे. याबाबतची अधिसूचना जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी जारी केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत शासन आपल्या दारी कार्यक्रम शुक्रवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापिठाच्या परिसरात होणार आहे. या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील विवीध शासकीय योजनांचे एक लाख लाभार्थी येणार आहेत. त्यांच्या वाहतुकीसाठी दोन हजार बसेस आणि शेकडो चारचाकी वाहनांची व्यवस्था प्रशासनाने केली आहे. यामुळे महामार्गावर वाहतूक कोंडी लक्षात अवजड वाहतूक शुक्रवारी सकाळी १२ ते रात्री ११ वाजेपर्यंत तर खोपोली–पाली ते वाकण मार्गावरील अवजड सकाळी ८ ते १२ आणि दुपारी ३ ते रात्री १० या कालावधीसाठी बंद ठेवली जाणार आहेत. जीवनावश्यक वस्तू, औषधे आणि ऑक्सिजनची वाहतूक करणाऱ्या वाहनांना यातून सूट देण्यात आली आहे.

खारपाडा ते कशेडीदरम्यान अवजड वाहतूक बंद राहणार आहे. या कालावधीत महामार्गावरील सर्व अवजड वाहने पर्यायी मार्गाने वळवली जाणार आहेत. याबाबतचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केले आहेत.

## रायगड ‘एलसीबी’ने लावला १७ गुन्ह्यांचा छडा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने (एलसीबी) उल्लेखनिय कामगिरी करीत ९७ गुन्हे उघडकीस आणले. यामध्ये सहा खून, सात जबरी चोरी, ४४ घरफोडी, ३५ चोरी, पाच फसवणूक या गुन्ह्यांचा समावेश असल्याची माहिती पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

१२० अवैध धंद्यांवर गुन्हे अन्वेषण विभागाने कारवाई केली. यामध्ये गुटखा १४, अंमली पदार्थ सहा, जीवनावश्यक वस्तू एक, आर्म अॅक्ट तीन, जुगार ६१, दारू ३६ या प्रकारच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. गुटखाप्रकरणी २१ आरोपी अटक करण्यात आले.

अंमली पदार्थ सहा, जीवनावश्यक वस्तू एक, आर्म अॅक्ट नऊ, जुगार ६८, दारू ३६ अशा एकूण १४० जणांना अटक करण्यात आली. या सर्व प्रकारच्या अवैध धंद्यातून ३२ लाख ८३ हजार २०२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

खूनप्रकरणी आठ आरोपी अटक करण्यात आले, तर जबरी चोरी सात, घरफोडी २३, चोरी २६, फसवणूक १५ असे एकूण ७९ आरोपी मागील २०२३मध्ये अटक करण्यात आले. जबरी चोरी, घरफोडी, चोरी, फसवणूक या प्रकरणात एक कोटी ४३ लाख ३० हजार १४४ रुपयांचा माल चोरीस गेला होता. त्यापैकी एक कोटी २३ लाख ८७हजार ९९ इतका माल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. जवळपास ८६ टक्केपर्यंतची कामगिरी पोलिसांनी पार पाडली.



**खालापूर : मुंबई–पुणे एक्स्प्रेस वे वर पुणे लेनवर आडोशी बोगद्यादरम्यान सिमेंट वाहतूक करणाऱ्या बल्करच्या टायरला बुधवारी सायंकाळच्या दरम्यान आग लागली. घटनास्थळी खोपोली नगरपालिकेच्या अग्निशमन दलाचे जवान मोहन मोरे व त्यांचे पथक दाखल झाले आणि त्यांनी काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवले.**

## महावितरणने केले १२९ वीजचोरांवर गुन्हे दाखल

**नवी मुंबई** : घणसोलीमध्ये वीजहानी जास्त असल्यामुळे वीजचोरी मोहीम राबविण्याच्या सूचना भांडूप परिमंडलचे मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी दिल्या होत्या. त्यानुसार वाशी मंडळाचे अधीक्षक अभियंता, सिंहाजीराव गायकवाड यांनी मंडळ कार्यालय स्तरावर वाशी विभाग व नेरूळ विभाग यांचे संयुक्त सहकार्याने मोहिमेमध्ये कलम १३५ अंतर्गत साधारणतः ७७ लाखांची १४६ प्रकरणे उघडकीस आणली.

कलम १२६ अंतर्गत अनधिकृत वीजवापराची २६ प्रकरणे उघडकीस आणली होती. त्या अंतर्गत १२.९५ लाखांची दंडात्मक रकमेची वीजबिले दिली होती. अशी एकूण ९० लाखांची वीजचोरी व अनधिकृत वापराची एकूण १७५ प्रकरणे उघडकीस आणली होती. घणसोली शाखेचे सहाय्यक अभियंता सुनील सरोदे, यांनी वाशी पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल केले. त्यांना अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. गोफणे, वरिष्ठ तंत्रज्ञ अश्विनी शेवाळे, सहाय्यक लेखापाल, राखी चोगुले, उच्चस्तर लिपीक, निलेश कराळे यांची मदत झाली.

## सीकेटी महाविद्यालयात कला प्रदर्शन





(छाया : अक्षय शार्दुल)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयाच्या इंटीरियर डिझाईन विभागाच्या निर्मिती कलाप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांच्या हस्ते बुधवारी (दि. ३) झाले. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कलाकृतींचे प्रदर्शन तसेच पेशवाई परंपरेचे चित्रीकरण करण्यात येणार आहे.

या वेळी प्रो. डा. एस. बी. यादव, डॉ. एस. आय. उन्हाळे, डॉ. बि. एस. पाटील, को–ऑर्डिनेटर प्रज्योती देसाई, चिनया गावंड, सुचित्रा गवळे, मनिषा पाटील, संध्या सिंग यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## हर्क्युलस हॉईस्ट कंपनीत तंबाखूमुक्तीसाठी जनजागृती

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

तंबाखू, सिगरेट, गुटख्याचे सेवन केल्याने कॅन्सरसारखा रोग होतो तसेच कॅन्सर झालेल्या व्यक्तीच्या कुटूंबावरही त्याचा परिणाम होतो. ही परिस्थिती आपल्यावर ओढावू नये म्हणून आपण व्यसनांपासून दूर रहावे, तसेच इतरांनाही परावृत्त करावे, असे आवाहन भाजपप्रणित जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत यांनी खालापूर येथे केले.

खालापूरमधील हर्क्युलस हॉईस्ट कंपनीमध्ये तंबाखूमुक्त दिन बुधवारी (दि. ३) साजरा करण्यात आला. यानिमित्त कंपनीमध्ये ३ आणि ४ जानेवारीदरम्यान व्यसनांचे सेवन न करण्याबद्दल जनजागृतीपर अभियान राबवण्यात आले. त्या अंतर्गत कामगारनेते जितेंद्र घरत यांच्या हस्ते या जनजागृती अभियानाच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले. त्यांनी अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांना व्यसनांमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीची जाणीव करून देऊन त्यांचे सेवन न करण्याचे आवाहन केले.



(छाया : प्रफुल्ल कांबळे)

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात बुधवारी (दि.३) भारतीय स्त्री मुक्तीच्या व स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, प्रथम शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. त्यांनी नमूद केले की, स्त्री उद्धारासाठी आपले सर्वस्व वाहून देत महात्मा ज्योतिराव फुले यांनी हाती घेतलेल्या समाजोद्धाराचा वसा तितक्याच नेटाने पुढे नेणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई पहिल्या शिक्षिका होत्या.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. प्रतीक्षा पाटील समन्वय स्टाफ वेल्फेअर, डॉ. नीलम लोहकरे, प्रा. प्रथमेश उदेकर, प्रा. रिझवाना मोमीन, वैभव झगडे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

**पान १ वरुन**

### पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते १२ जानेवारीला शिवडी–न्हावा सी लिंकचे उद्घाटन

उरण–पनवेलमध्ये होणारे विकासात्मक टप्पे पाहता हे एक हब निर्माण होत आहे. नवी मुंबई विमानतळ आणि या सी–लिंकमुळे जगाशीही थेट संबंध या परिसराचा येणार आहे. त्याचबरोबर आता हा परिसर व मुंबई हाकेच्या अंतरावर आले आहे. त्याचा फायदा रायगड, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पालघर अशा सर्वच भागातील प्रवाशांना होणार आहे तसेच या भागातील गावांचा झपाट्याने विकास होणार आहे. त्या अनुषंगाने हा प्रकल्प येथील लोकांसाठी महत्त्वपूर्ण असा आहे.

या प्रकल्पाचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार असून सभा नवी मुंबई विमानतळ परिसरातील भव्य मैदानावर होईल. त्यांचे मोलाचे मार्गदर्शन ऐकण्यासाठी ५० हजारपेक्षा जास्त नागरिक या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. त्या वेळी नागरिकांची बैठक व्यवस्था, प्रवास, अल्पोहार आदी व्यवस्था सुरळीत करण्यासाठी नियोजन बैठक झाली. या वेळी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी मार्गदर्शन करून आवश्यक त्या सूचना केल्या.

### महायुतीतर्फे १४ जानेवारीला राज्यभर मेळावे

फेब्रुवारीमध्ये विभागीय स्तरावर मेळावे होणार असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील सर्व मंत्री, घटक पक्षांतील नेते या मेळाव्यांना उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यांना रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले, महादेव जानकर, शिवसंग्रामच्या ज्योती मेटे, विनय कोरे, जयदीप कवाडे, सुलेखा कुंभारे आदी उपस्थित राहणार आहेत.

राज्यभरातील प्रवासात आपल्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रियतेची लाट अनुभवण्यास मिळाली असून राज्यात महायुतीचे ४५पेक्षा अधिक उमेदवार विजयी होतील, असे सांगून प्रदेशाध्यक्ष बावनकुळे म्हणाले की, बूथस्तरापर्यंत रचना तयार करून ५१ टक्के मते मिळवण्याचा महायुतीचा निर्धार आहे. मोदी लाट दिसू लागल्यामुळे यापुढील काळात महायुतीमध्ये आणखी मोठे पक्ष प्रवेश होतील.

### १४ जानेवारीला ’नमो’ खारघर मॅरेथॉन

१४ जानेवारीला खारघर सेक्टर १९ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथून या मॅरेथॉन स्पर्धेला सकाळी ५ वाजता मान्यवरांच्या हस्ते झेंडा दाखवून सुरुवात होणार असून पारितोषिक वितरण सोहळाही त्याच ठिकाणी सकाळी ९ वाजता होणार आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते व स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या स्पर्धेसाठी विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि सेलिब्रिटींची मांदियाळी लाभणार आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सन २००६ साली पनवेल मॅरेथॉनच्या अनुषंगाने या स्पर्धेला प्रारंभ झाला. प्रथम आयोजनापासून ते आजपर्यंत उत्तम आणि नीटनेटक्या आयोजनामुळे स्पर्धा उत्तरोत्तर यशस्वी होत गेली. यापूर्वीच्या मॅरेथॉन स्पर्धा ‘रन अगेन्स्ट एड्स’, ‘पर्यावरणाच्या संरक्षणासाठी’, ‘एक धाव आरोग्यदायी पनवेलसाठी’, ‘रन फॉर निर्भय भारत’, ’सद्भावना दौड’, ‘एक धाव पाणी बचतीसाठी’, ‘स्त्री–भ्रूणहत्येविरोधात एक धाव’, ‘एक धाव महिलांच्या सन्मानासाठी’, ‘रन टू प्रमोट कॅशलेस ट्रान्झॅक्शन’, ‘हम फिट तो इंडिया फिट’, ’एक धाव व्यसनमुक्तीसाठी’ अशी घोषवाक्य घेऊन उत्कृष्ठ आयोजनाने यशस्वी झाल्या आहेत. सामाजिक व शारीरिक हित जोपासले जात उत्कृष्ट व सुयोग्य नियोजन आणि वेगवेगळ्या सामाजिक संदेशासाठी प्रसिद्ध असलेल्या या स्पर्धेने लोकप्रियतेची शिखरे गाठली आहेत.

यंदाची स्पर्धा १४वी असून स्पर्धा पुरुष खुला गट १० किलोमीटर अंतर, महिला खुला गट १० किलोमीटर अंतर, १७ वर्षाखालील मुले गट ५ किमी अंतर, १७ वर्षाखालील मुली गट ५ किलोमीटर, १४ वर्षाखालील मुले गट ५ किमी अंतर, १४ वर्षाखालील मुली गट ५ किमी अंतर तसेच खारघर दौड गट ३ किलोमीटर आणि सिनिअर सिटीझन दौड २ किलोमीटर अशा आठ गटांत होणार असून दोन लाख रुपयांची बक्षिसे आहेत तसेच स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला आकर्षक मेडल देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. यातील पुरुष खुला गट व महिला खुल्या गटासाठी १०० रुपये, तर उर्वरित गटांसाठी २० रुपये नाममात्र प्रवेश फी असणार असून ही प्रवेश फी सामाजिक उपक्रमासाठी वापरली जाते.

स्पर्धा दरवर्षीप्रमाणे यशस्वी करण्यासाठी स्वागत, प्रसिद्धी, आयोजन, मार्ग नियोजन, प्रवेशिका देणे व घेणे, पंच व नियमावली, फिडिंग व स्पंजिग, साहित्य, नियंत्रण, मार्ग आखणी, प्रथमोपचार, बक्षीस वितरण अशा विविध समित्या असणार आहेत. या स्पर्धेची जोरदार तयारी सुरू आहे.

## म्हसळा खरसई येथे घरफोडी; गुन्हा दाखल

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यातील खरसई येथे झालेल्या घरफोडीप्रकरणी मंगळवारी (दि. २) तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची फिर्याद रुक्साना नदीम कुडकीकर (वय ३८, रा. खरसई) यांनी दिली. फिर्यादीच्या तक्रारीनुसार ही घरफोडी १८ डिसेंबर २०२३ रोजी सायंकाळनंतर घडल्याचे पोलिसांनी सांगितले.

घरफोडीत रोख ४० हजार आणि २२ हजार ५०० रुपयांचे दागिने असा ऐवज लंपास झाले आहेत. अधिक तपास पोलीस हेड कॉंस्टेबल एन. डी. देवडे, सपोनि. संदिपान सोनवने यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.



## पोलादपूर तालुका विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन


**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील दुर्गमता आणि गरिबी यामुळे विज्ञान प्रदर्शनाला उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस घटत आहे. तालुक्यातील कोणीही हुशार विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी आर्थिक अडचणी आल्यास आपण मदतच करू, अशी ग्वाही आमदार भरत गोगावले यांनी दिली.

आंबवडे सैनिक विकास मंडळ फौजी आंबवडे ता. महाडच्या स्व. शां. शं. जाधव न्यू इंग्लिश स्कूल पळचिल आणि पंचायत समिती पोलादपूरच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुका विज्ञान प्रदर्शनावेळी ते उद्घाटक म्हणून बोलत होते. ग्लिसरीन आणि पोटॅशियम परमॅंग्नेटच्या अभिक्रियेतून अग्निनिर्मितीद्वारे दीपप्रज्वलन करून प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.


या वेळी माजी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, माजी राजिप सदस्या सुमन कुंभार, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य निवास शेठ, माजी सभापती महादेव निविलकर, सैनिक विकास मंडळाचे संस्थापक वासुदेव पवार, कार्यवाह विष्णू पवार, गटविकास अधिकारी दिप्ती गाट, गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे, विज्ञान मंडळ अध्यक्ष सुरेश साबळे, उपाध्यक्ष एस. बी. शिंदे, सचिव पंकज मिरजोळकर, केंद्रप्रमुख रंजना जाधव, अनिल जाधव, शाळा समिती अध्यक्ष उमेश मोरे, उपाध्यक्ष निवृत्ती जाधव, मुख्याध्यापक संजय जैतपाल तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.





### दुखवटा

**वासुदेवबुवा सुतार**



**नवी मुंबई** : ठाणे जिल्ह्यातील प्रथितयश भजन कलावंत वासुदेवबुवा सुतार यांचे मंगळवारी (दि. २) वयाच्या ९४व्या वर्षी शिरवणे येथील राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात भजन तीन मुले, तीन मुली, जावई, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. शिरवणे गावातील हनुमान प्रासादिक भजन मंडळाचे वासुदेवबुवा सुतार हे सर्वेसर्वा होते. भजनाच्या माध्यमातून गेली ७५ वर्षांहून अधिक काळ त्यांनी सांप्रदायिक एकता व एकात्मता जपण्याचे, जोपासण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. १९९३ साली नवी मुंबई कला संकुलच्या माध्यमातून त्यांना भजन सम्राट या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

# करंजाडेमध्ये विकासाची गंगा

## सरपंच मंगेश शेलार यांचा पुढाकार; वर्षभरात ३१ कामे

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन वर्षात करंजाडे ग्रामपंचायत हद्दीमध्ये सुमारे ४०० सीसीटीव्ही लावण्याचा संकल्प केला आहे. त्याचबरोबर सेक्टर ६ ते १ या रस्त्याच्या कामाला लवकरच सुरुवात होणार असल्याने नागरिकांना नवीन वर्षात चांगल्या दर्जाच्या रस्त्यांचे गिफ्ट मिळणार आहेत. पाणी, वीज, आरोग्य सुविधा, गटारे, रस्ते यांसह विविध समस्या मार्गी लावून पायाभूत सुविधांवर अधिक भर दिला जात आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून अवघ्या एक वर्षात विविध प्रकारची ३१ विकासकामे मार्गी लावण्यात यश आल्याची माहिती करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार यांनी दिली.

करंजाडे ग्रामपंचायतीच्या स्थापनेपासून ग्रामपंचायतीवर मागील वर्षी भाजपने शेकापची सत्ता उलथवून लावली आणि भाजपचे ११पैकी १० सदस्य निवडून आले. सरपंच मंगेश शेलार यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण झालेल्या व प्रास्तावित विकासकामांची माहिती देण्यासाठी मंगळवारी (दि. २) पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी सरपंच मंगेश शेलार बोलताना, आम्ही ग्रामपंचायत निवडणुकीत जिंकून आल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून कामाला सुरुवात केली. त्याचे परिणाम आता दिसत आहेत. वर्षभरात प्रामुख्याने करंजाडे गावातील प्रवेशद्वार, रुग्णवाहिका सेवा, गणेश नगर ते टाटा पॉवर रस्त्याचे काँक्रिटीकरण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथे सभामंडप, ग्रामपंचायत हद्दीत ओपन जिम, करंजाडेतील तलावातील गाळ काढणे, गणपती विसर्जन घाट बांधणे, करंजाडे गावात शौचालय बांधणे, शिवमंदिर येथे सार्वजनिक शौचालय बांधणे, सेक्टर ६करिता १५० एमएलटी पाणी पाईपलाईन जोडण्याचे काम, करंजाडे वसाहतीतील सोसायटीत तसेच ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी बेंचेस, गणेश नगर अंतर्गत गटारे दुरूस्त करणे, गावदेवी आदिवासीवाडी येथे रस्ता काँक्रिटीकरण करणे, मुकरीची आदिवासीवाडी येथे शौचालय बांधणे, शिवमंदिर रस्त्याचे काँक्रिटीकरण यांसारखी विविध ३१ विकासकामे मार्गी लावण्यात ग्रामपंचायतीला यश आले आहे, तर करंजाडेतील शिवमंदिर येथून पनवेल शहराला जोडणाऱ्या पुलाच्या कामासाठी पाठपुरावादेखील सुरू असल्याची माहिती दिली.



करंजाडे ग्रामपंचायतीत भाजपची सत्ता आल्यानंतर एक वर्ष पूर्ण झाल्याप्रित्यर्थ सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, ग्रामसेवक देवकर, विभागीय अध्यक्ष कर्ण शेलार, भाजप पनवेल तालुका उपाध्यक्ष बळीराम म्हात्रे, गणेश मोरे, संतोष विखारे, राज इंगळे, सागर कदम, गणेश प्रबळकर यांच्यासह सर्व ग्रामपंचायत सदस्यांनी केक कापून आनंद साजरा केला. नवीन वर्षात आणि यापुढील चार वर्षात करंजाडेमधील सर्व नागरिकांना उत्तम सुविधा पुरवण्यासाठी करंजाडे ग्रामपंचायत कटिबद्ध राहणार असल्याचा संकल्प करण्यात आला.

**माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार महेश बालदी व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनामुळे तसेच भक्कम पाठबळामुळेच वर्षभरात विविध समस्या मार्गी लावण्यात यश आले. यासाठी सर्व सहकारी सदस्यांचेही चांगले सहकार्य लाभले. नवीन वर्षात करंजाडेतील नागरिकांना पाणी, उत्तम रस्ते, वीज आणि विविध पायाभूत सुविधांच्या माध्यमातून विकासकामांचे चांगले गिफ्ट मिळेल.**
**-मंगेश शेलार, सरपंच, करंजाडे ग्रामपंचायत**

**सेक्टर ५ व ६मध्ये रात्रभर जागून ही पाणी मिळत नव्हते. सिडको प्रशासन मोठमोठ्या सोसायट्यांना दोन-तीन दिवसांनी एखादा टँकर देत होते. तो पुरत नसल्याने टँकर विकत घ्यावा लागत होता. आता सेक्टर ६करिता नवीन कनेक्शन दिल्याने अनेक दिवसांची पाण्याची समस्या सुटली आहे.**
**-सलोनो सिंग, रहिवासी**

# खारघरमध्ये जेवणाच्या बिलावरून मारहाण

**पनवेल : वार्ताहर**

जेवणाचे बिल अधिकचे लावल्याच्या कारणावरून हॉटेलमालकास विचारणा केली असता हॉटेलमालक अजय कुमार पांडे आणि हॉटेलमधील पाच ते सहा वेटरनी मिळून सळीने आणि लाकडी फळीने मारहाण केल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

विलाल विहान हे सेक्टर १०, खारघर येथे राहत असून, ते मित्र व मैत्रिणींसह जेवणासाठी दिल्ली तंदुरी हॉटेल येथे गेले होते. बिल देत असताना एकूण बिल वाढवून दिल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी जास्तीचे बिल का लावले? याची विचारणा केली असता वेटरने मालकाला फोन लावून दिला. त्या वेळी पैसे बरोबर लावले आहे ते बिल द्यावे लागेल, असे म्हणाला. त्यांच्यात वादावादी झाली.

हॉटेल मालकाने विशाल विहान याला धक्का दिला, तसेच हॉटेलमधील लाकडी फळीने मारहाण केली. यात विशाल जखमी झाला. त्यानंतर हॉटेलमधील पाच-सहा वेटरनीही मारहाण केली. त्याची मैत्रीण व त्याचा भाऊ तेजदर भांडण सोडवण्यासाठी आले असता मैत्रिणीला धक्काबुक्की व भावाला मारहाण केली. याप्रकरणी खारघर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## मद्यविक्री केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

देशी दारूची विक्री केल्याप्रकरणी कोपरागाव, सेक्टर १० येथील एका व्यक्तीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

कोपरा गाव प्रवेशद्वाराजवळ मद्यविक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार एकाकडे प्लास्टिकच्या पिशवीत मद्य आढळले. त्याच्याजवळ पोलीस गेले असता त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी नरेंद्र पाटील (३८, रा. कोपरागाव) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





(छाया : अक्षय शार्दुल)

**पनवेल : नववर्षानिमित्त माजी नगरसेवक निलेश बावीस्कर यांच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन पक्षाचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले; तर अस्मिता कला, क्रीडा, सांस्कृतिक मंडळ आणि प्रियदर्शनी महिला मंडळाकडून दिनदर्शिका भेट देण्यात आली. या वेळी प्रभाग समिती 'ड'च्या माजी सभापती सुशीला घरत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, मार्तंड सोनावणे, आनंद मोकाशी, दर्शन सिंग, राजू वायचळ, विनिश नायर, प्रमोद गर्जे, खारघर महिला मोर्चा सरचिटणीस कंचन बिर्ला, प्रतीक्षा माळी, आशा मोरे, प्रिया राजकुमार, पुष्पा पुरोहित, विमल कांबळे, कविता तन्ना, छाया हारेल, शकुंतला निगी, निती ओझा, लक्ष्मी चव्हाण, गौरी पवार, सीमा नरे, शहाबाई काशिद आदी उपस्थित होते.**

# फसवणूक झालेल्या नागरिकांना पोलिसांचे आवाहन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाणे हद्दीत आरोपी नारायण सिंह राजपुत, त्यांची पत्नी हवनकुवर नारायणसिंह राजपुत व इतरांनी संगनमताने त्यांचे मालकीची नवीन पोसरी मोहोपाडा येथे बांधण्यात आलेल्या इमारतीमधील पहिल्या मजल्यावर घर देतो, असे सांगून फसवणूक झाली असल्यास त्वरीत रसायनी पोलीस ठाण्यात संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

या संदर्भात गुरुनाथ जनार्दन गाताडे (वय ४४, रा. जाताडे, ता. पनवेल) यांची फसवणूक झाल्याने त्यांनी रसायनी पोलीस ठाणे येथे तक्रार दिली आहे. आरोपी नारायण सिंह राजपुत व इतरांनी आणखी कोणास घर देतो, असे सांगून अथवा माजिमा स्विट ॲण्ड ड्रायफ्रुट मार्टमध्ये गुंतवणूक करून पैसे डबल करून देतो, असे सांगून फसवणूक केली असल्यास त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ बालवडकर यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.





**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उलवे नोड येथे ॐ साई कला, क्रीडा व संस्कृतिक मंडळाच्या वतीने उभारण्यात आलेल्या साईबाबा मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, मंडळाचे अध्यक्ष मनोज विष्णू घरत तसेच संदीप वायंगणकर, गोविंद रोहरा, उदय रेनके आदी उपस्थित होते.**

# नवीन पनवेलमध्ये योग विज्ञान शिबिर

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पतंजली योग समितीच्या वतीने नवीन पनवेलमधील शहिद तुषार शामराव चव्हाण उद्यानात निःशुल्क योग विज्ञान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर या उद्यानात १५ दिवस सुरू राहणार असून बुधवारी (दि. ३) यामध्ये पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर आणि स्थायी समितीचे माजी सभापती संतोष शेट्टी यांनी सहभाग घेतला.



(छाया : प्रफुल्ल कांबळे)

या वेळी त्यांना योग शिक्षक जितेंद्र तिवारी यांनी योगासनांची प्रात्यक्षिके दाखवली. या योग विज्ञान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. या वेळी माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी, योगासनांमुळे मन तणावमुक्त होते आणि जीवनात ऊर्जा, उत्साह, आनंद आणि आत्मविश्वास वाढतो, पचनसंस्था, रोगप्रतिकारक शक्ती, रक्ताभिसरण प्रणाली आणि हार्मोनल प्रणाली संतुलित राहते. शारिरीक, मानसिक आजार तसेच असाध्य रोगांपासून कायमस्वरूपी आराम मिळू शकतो, असे सांगत योगाचे जीवनातील महत्त्व स्पष्ट केले.

## राष्ट्रवादी महिला तालुका अध्यक्षपदी कुंदा ठाकूर

**उरण** : राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला तालुका अध्यक्षपदी माजी जिल्हा परिषद सदस्या कुंदा ठाकूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, रायगड जिल्हा राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या अध्यक्ष उमा मुंढे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

कुंदा ठाकूर या जासई गटाच्या जिल्हा परिषद म्हणून भरघोस मतांनी निवडून आल्या होत्या. त्यांच्या निवडीबद्दल सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



**पनवेल : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त भाजप मध्यवर्ती कार्यालयात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला महिला मोर्चाच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी भाजपच्या उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुशीला घरत, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष निता चोणकर, शहराध्यक्ष राजश्री वावेकर, सरचिटणीस सपना पाटील, लक्ष्मी चव्हाण, शोभा काशीद, गौरी पवार, सीमा नरे, यमुना प्रकाश यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.** (छाया : योगेश पाटील)

# सीकेटी महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात महिला विकास कक्षाच्या वतीने बुधवारी (दि. ३) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.



या कार्यक्रमासाठी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, कलाशाखा प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील, वाणिज्य शाखेचे प्रमुख प्रो. डॉ. एस. बी. यादव आणि महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा डॉ. आर. डी. म्हात्रे व इतर प्राध्यापक उपस्थित होते.

डॉ. आर. डी. म्हात्रे यांनी, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी दिलेल्या योगदानाची माहिती दिली. प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर मराठी विभागप्रमुख प्रा. एम. एम. अंबुलगेकर यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी देशात स्त्रियांना उत्तम शिक्षण मिळण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला. कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता प्रा. बी. ए. भोईर, जी. के. सुर्वे यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, सचिव डॉ. एस. टी. गडदे, यांनी आयक्यूएसी समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर यांनी शुभेच्छा दिल्या.

## महेश साळुंके यांना पुरस्कार जाहीर

**पनवेल : वार्ताहर**

सामाजिक व राजकीय क्षेत्रात गेल्या अनेक वर्षापासून केलेल्या कामाची दखल घेत स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंके यांना मनोज संसारे स्मृती संघर्षयात्री गौरव पुरस्कार अर्थात प्रशिक सन्मान २०२३ने गौरविण्यात येणार आहे.

दरवर्षी या संस्थेच्या वतीने वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांना प्रशिक सन्मान देऊन सन्मानित करण्यात येते. या संस्थेची स्थापना २००६ मध्ये झाली असून यावर्षी या संस्थेचा वर्धापन दिन शनिवारी (दि. ६) रायगड पब्लिक स्कूल देवीचा पाडा येथील प्रांगणात प्रशिक सन्मान २०२३ हे पुरस्कार केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते वितरण करण्यात येणार आहे.

# उरणमध्ये रक्तदान शिबिर

**उरण : बातमीदार**

न्हावा शेवा सीएचए आधार सामाजिक संस्थेच्या वतीने रविवारी (दि. ७) श्रीदत्त मंदिर, पाणदिवे येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सामाजिक बांधिलकी जपत देशातील थॅलेसेमिया व अपघातग्रस्त रुग्णांची रक्ताची गरज लक्षात घेऊन आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन न्हावा शेवा सीएचए आधार सामाजिक संस्थेतर्फे करण्यात आले आहे. नावनोंदणी व अधिक माहितीसाठी रुपेश भगत (९६१९३९५२९२), श्याम गावंड (९६६४०३४३४७), हनुमान म्हात्रे (९८६७८८६४८०) यांच्याशी संपर्क साधावा.



**पनवेल : पहिल्या स्त्री शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १९४वी जयंती करंजाडे ग्रामपंचायत कार्यालयात बुधवारी साजरी करण्यात आली. या वेळी सरपंच मंगेश शेलार, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.**

## संपादकीय

# विश्वास ठेवला पाहिजे!

मराठा आरक्षणासाठी राज्य सरकारतर्फे प्रत्येक पातळीवर वेगाने आणि प्रामाणिक प्रयत्न सुरू आहेत. अन्य कुठल्या समाजावर अन्याय होऊ न देता न्यायालयात टिकणारे आरक्षण मराठा समाजाला देण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. म्हणूनच मराठा समाजाचे मागासलेपण सिद्ध करण्याच्या दृष्टीने खुल्या प्रवर्गातील नागरिकांचे घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्याचा निर्णय राज्य मागासवर्ग आयोगाने घेतला आहे. सरकारी कर्मचाऱ्यांकडूनच ही प्रक्रिया राबवण्यात येणार आहे.

**मराठा आरक्षणाचा चिघळलेला प्रश्न आता खऱ्या अर्थाने मार्गी लागेल असे दिसते. तसा तो सकारात्मक दिशेने काही वर्षांपूर्वी वाटचाल करू लागला होताच. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बुद्धिचातुर्याच्या आणि प्रामाणिक नेतृत्वाच्या जोरावर उच्च न्यायालयात मराठा आरक्षण टिकलेच होते. दुर्दैवाने नंतर आलेल्या महाविकास आघाडीच्या सरकारने या विषयाची हेळसांड केली आणि सर्वोच्च न्यायालयात अपयश पदरात पडले. विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तर मराठा आरक्षणाच्या प्रश्नी रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत लढणार असल्याचे जाहीरपणे सांगितले आहे. तसे बघायला गेले तर सर्वेक्षणाची प्रक्रिया बऱ्यापैकी किचकट आणि गुंतागुंतीची आहे हे खरे, पण तरीही योग्य पद्धतीने आणि नियोजित वेळेत ही प्रक्रिया आयोगाने पूर्ण करावी, असे आदेश मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी मंगळवारच्या बैठकीत दिले. मराठा आरक्षणासंदर्भात मंगळवारी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मराठा आरक्षण व सुविधा मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक पार पडली. मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्री आणि अन्य ज्येष्ठ मंत्री या वेळी उपस्थित होते. मराठा समाजाचे शैक्षणिक व सामाजिक मागासलेपण आता लपून राहिलेले नाही. या समाजाला आरक्षणासारख्या आधाराची गरज आहे हे सर्वश्रुतच आहे. त्यासाठी अशा सर्वेक्षणाची गरज होतीच. योग्य प्रकारे सर्वेक्षण झाल्यास सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारला भक्कमपणे बाजू मांडता येईल. महाराष्ट्रातील सामाजिक घडणीची माहिती (डेटा) योग्य पद्धतीने सर्वोच्च न्यायालयासमोर मांडता आली तर यश निश्चितच पदरात पडेल. हे कठीण असले तरी अशक्यही नाही. मुद्दा आहे तो राजकीय इच्छाशक्तीचा. मागील सरकारच्या मनात ना इच्छा होती, ना पर्वा. परिणामी मराठा आरक्षणाला दोन पावले मागे जावे लागले. तरीही प्रयत्न न सोडता शिंदे-फडणवीस सरकारने पुन्हा एकदा जोर लावण्याचा संकल्प सोडला आहे. त्याचे मराठा समाज स्वागतच करेल हे निश्चित. बिहारच्या धर्तीवर राज्यातही जातनिहाय जनगणनेची मागणी करण्यात येत आहे. मागासवर्ग आयोगाच्या काही माजी सदस्यांनीदेखील ही मागणी उचलून धरली होती, परंतु अशी जनगणना वेळखाऊ आणि दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया असते. त्यापेक्षा खुल्या वर्गातील नागरिकांच्या घरी जाऊन सर्वेक्षण केले तर बऱ्याच गोष्टी स्पष्ट होतील असे वाटते. घरोघरी सर्वेक्षण करण्याची तयारी प्रशासनाने केली असल्याचे दिसून येते. पुणे महापालिका प्रशासनाने तर येत्या १५ दिवसांत सर्वेक्षण पूर्ण करून त्याचा अहवाल राज्य मागासवर्गीय आयोगाला सादर करण्याचे ठरवले आहे. नेमका असाच वेग या कामी अपेक्षित आहे. सर्वेक्षणासोबतच इतरही काही अनुषंगिक बाबींची सोडवणूक सरकारला करावी लागणार आहे. उपसमितीच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांच्याशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सविस्तर चर्चा केली. 'सगेसोयरे' या शब्दावरून मध्यंतरी आंदोलक आणि सरकार यांच्यामध्ये वाद निर्माण झाला होता. हे सर्व वाद गाडून परस्पर विश्वासाच्या जोरावर मराठा आरक्षणाचे लक्ष्य साध्य करायचे आहे.**

# एक आगळीवेगळी निसर्ग सहल

नाताळच्या सुट्यांमुळे रायगड जिल्ह्यात पर्यटकांची गर्दी होते. थंडीची चाहूल लागली की रायगड पर्यटकांच्या वर्दळीने गजबजून जातो. याच दिवसांत प्रत्येक शाळेच्या सहली निघण्यास सुरुवात होतात. यामध्ये बऱ्याच शाळा जिल्ह्याला पहिली पसंती देतात आणि समुद्रकिनारे व गडकिल्ले तसेच धार्मिक स्थळे यांना भेटी देण्याची योजना आखतात, मात्र काही सहली जिल्ह्यातील जैवविविधता निसर्गाचा समृद्ध ठेवा व सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी व अभ्यासासाठी येत आहेत. अशाच प्रकारची सहल नुकतीच माणगाव तालुक्यातील पाटणूस परिसरात सोलापूर येथील शाळेची आली होती.









येथील निसर्ग अभ्यासक शिक्षक राम मुंडे यांनी सांगितले की, गेल्या काही महिन्यापूर्वी त्यांनी महात्मा फुले शाळा सौंदरे, ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणी पक्षी निरीक्षणाचा कार्यक्रम घेतला होता. छोट्या-छोट्या विद्यार्थ्यांनी अगदी मनापासून कार्यक्रम पहिला होता. कार्यक्रम झाल्यानंतर या सर्व चिमुकल्यांना मुंडे यांनी त्यांच्या शाळेला भेट देण्याची विनंती केली व सर्वजण आले, तर विद्यार्थ्यांना देवराई, जंगल, गिधाडांची घरे आणि स्थानिक निसर्गसौंदर्य दाखवण्याचे वचन दिले होते. या सर्व चिमुकल्यांनी ही गोष्ट लक्षात ठेवली आणि शाळेचे मुख्याध्यापक गणेश गोटे यांच्याकडे हट्ट धरला की सर आपण रामसरांच्या शाळेला भेट देऊ आणि त्यांची शाळा व आसपासचा निसर्ग व पक्षी पाहू.

मुलांच्या विनंतीला सरांनी मान देऊन थेट सहलीचे आयोजन केले आणि ही सर्व मंडळी ३५० किलोमीटरवरून राम मुंडे कार्यरत असणाऱ्या शाळेपर्यंत पोहचली. या सर्व मंडळींना मुंडे यांनी अवतीभोवतीच्या निसर्ग, जंगल, पक्षी, देवराई व गिधाडांची घरटी दाखवली आणि त्यांची माहिती दिली. निसर्गाचा हा सर्व समृद्ध ठेवा पाहून हे सर्व पाहुणे अचंबित झाले. शाळेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व संचालक मंडळांनी या पाहुण्यांना मुक्काम करण्यासाठी शाळेची इमारत दिली आणि शाळेचे अध्यक्ष सुरेश म्हामुणकर यांनी या सर्व विद्यार्थ्यांची भोजनाची सोय केली. अशा प्रकारे एक आगळीवेगळी अशी निसर्गसहल खूप छानरित्या पार पडली.

# कवयित्री आणि कथालेखिका इंदिरा संत



कवयित्री आणि कथालेखिका इंदिरा संत यांचा जन्म ४ जानेवारी १९१४ रोजी कर्नाटकाच्या इंडी या गावात झाला. कोल्हापूर व पुणे येथून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. बीए, बीटीडी व बीएड या पदव्या प्राप्त केल्यानंतर बेळगावच्या ट्रेनिंग कॉलेजात अध्यापिका म्हणून काम केले.त्यांचा विवाह सहाध्यायी नारायण संत यांच्याशी झाला.

शिक्षकीपेशा स्वीकारलेल्या इंदिरा संतांनी लहान मुलांच्या कथा लिहून आपल्या लिखाणाला सुरुवात केली.त्यांनी स्त्रीवादी कविता लिहण्यावर आपले लक्ष केंद्रित केले.त्यांनी भारतीय स्त्रीचे खडतर जीवन आपल्या कवितेतून मांडले. इंदिरा संत आणि त्यांचे पती नारायण संत यांचा एकत्र एक कविता संग्रह 'सहवास'प्रसिद्द्ध आहे. पतीच्या निधनानंतर त्यांनी आपल्या कवितेवर त्याचे परिणाम होऊ दिले नाही.

इंदिरा संत यांनी लिहिलेल्या प्रत्येक रचनेला काव्य रसिकांनी भरभरून दाद दिली. यांची सुमारे २५ पुस्तके प्रसिद्ध झाली आहे. यांच्या काही निवडक कविता 'मृण्मयी' या नावाने प्रसिद्ध झाल्या. कवितासंग्रह गर्भरेशीम, निराकार, बाहुल्या, मरवा, मृगजळ मेंदी, रंगबावरी, वंशकुसूम, शेला हे आहेत. कथासंग्रह कदली, चैतू, श्यामली असे आहेत, तर घुंघरवाळा ही त्यांची कादंबरी आहे.

इंदिरा संत यांना साहित्य अकादमी पुरस्कार, अनंत काणेकर पुरस्कार, साहित्य कला अकादमी पुरस्कार, महाराष्ट्र शासन पुरस्कार, जनस्थान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे निधन १३ जुलै २००० रोजी पुण्यात झाले.

(साभार : वेबदुनिया)



## बदलते तंत्रज्ञान

# 'या' वापरकर्त्यांचे इन्टाग्राम, फेसबुक खाते होणार डिलीट

तुम्ही जर सोशल मीडियाचा वापर करत असाल तर तुमच्यासाठी महत्वाची बातमी आहे. सोशल मीडियाबाबत सरकारने काही नियम बदलले आहेत. जर तुमचे सोशल मीडियावरील एखादे खाते बऱ्याच दिवसांपासून बंद असेल तर आता हे खाते सरकार कायमचे हटवणे अनिवार्य करू शकते. गेल्या तीन वर्षांपासून सोशल मीडिया आणि इंटरनेट प्लॅटफॉर्मपासून दूर राहिलेल्या युजर्सवर ही कारवाई होऊ शकते. हा प्रस्ताव डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन (उझउझ) कायद्याचा भाग आहे जो या वर्षी ऑगस्टमध्ये कायदा बनला आहे. हा युजर्समध्ये चर्चेचा विषय बनला असून त्यावर तातडीने कारवाई करण्याची योजना आखली जात आहे. सोशल मीडियाबाबत बनवलेला हा नियम ई-कॉमर्स कंपन्या, ऑनलाइन मार्केटप्लेस, गेमिंग कंपन्या आणि सर्व सोशल मीडिया कंपन्यांनाही लागू होऊ शकतो. याच्या मदतीने भारतातील युजर्सचा डेटाही कळेल.



अधिकाऱ्याने दिलेली माहिती अशी, सरकारला सोशल मीडिया कंपन्यांकडून फीडबॅक मिळाला होता. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सीला हा डेटा गोळा करायचा असेल, तर ते तीन वर्षांनंतर खाते बंद करून तसे करू शकतात तसेच वैयक्तिक डेटा मिळविण्यासाठी परवानगी घेण्याची संकल्पनाही रद्द करण्यात यावी.

मसुद्यात असे नमूद केले आहे की, काही सार्वजनिकरित्या उपलब्ध वैयक्तिक आरोग्यसेवा व्यावसायिक, क्लिनिकल आस्थापना, वैद्यकीय शैक्षणिक संस्था, आरोग्यसेवा व्यावसायिक, आरोग्यसेवा आणि मानसिक आरोग्य सेवा आस्थापने वैयक्तिक आणि गैर-वैयक्तिक डेटामध्ये प्रवेश करू शकतात. सार्वजनिक आरोग्य किंवा पुराव्यावर आधारित संशोधन करण्यात खूप मदत होईल. सार्वजनिक आरोग्य लक्षात घेऊन सरकारी संस्था आणि अधिकारीही या डेटाचा वापर करू शकतील. यावर लोकांची मते भिन्न असू शकतात, मात्र सामाजिक सुरक्षेचा विचार करून हा नियम आणण्यात आला आहे.

# संगीत नाटककार विद्याधर गोखले



## निमित्त

विद्याधर संभाजीराव गोखले यांचा आज स्मृतिदिन. विद्याधर गोखले हे मराठी पत्रकार व संगीत नाटककार होते. त्यांचा जन्म ४ जानेवारी १९२४ रोजी अमरावती या ठिकाणी झाला. अमरावतीत पदवीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर १९४४ मध्ये ते मुंबईला आले.

विद्याधर संभाजीराव गोखले यांचा आज स्मृतिदिन. विद्याधर गोखले हे मराठी पत्रकार व संगीत नाटककार होते. त्यांचा जन्म ४ जानेवारी १९२४ रोजी अमरावती या ठिकाणी झाला. अमरावतीत पदवीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर १९४४ मध्ये ते मुंबईला आले. जनरल एज्युकेशन सोसायटीच्या कुर्ला येथील शाळेत इंग्रजी, मराठी, संस्कृत विषयाचे त्यांनी अध्यापन केले. त्यानंतर त्यांनी दैनिक लोकसत्तामध्ये बरीच वर्षे पत्रकारिता केली व त्यानंतर पाच वर्षे त्यांनी संपादक म्हणूनही काम पाहिले.

पत्रकारिता करीत असताना वृत्तपत्राबरोबरच त्यांची लेखणी नाट्यलेखन करू लागली. संगीत नाटकांच्या परंपरेचा वारसा त्यांनी पुढे चालविला. त्यांनी एकूण १८ नाटके लिहिली. त्यापैकी काही ऐतिहासिक, पौराणिक, तर काही सामाजिक विषयांवर आधारित आहेत. त्यांची संगीत नाटके तर लोकप्रिय झालीच, पण त्यातील पदांनी आजपर्यंत मराठी मनाला भुरळ घातली आहे.

'झंझावात' (कादंबरी), नाटके- 'संगीत अमृत झाले जहराचे' (१९६५), 'इब्राहिमखान गारदी', 'संगीत चमकला ध्रुवाचा तारा' (१९६९), 'संगीत जय जय गौरीशंकर' (१९६६), 'जावयाचे बंड', 'संगीत पंडितराज जगन्नाथ' (१९६०), 'बरसते सूर्यातून चंद्रिका', 'बावनखणी' (१९८३), 'संगीत मदनाची मंजिरी' (१९६५), 'संगीत मंदारमाला' (१९६३), 'संगीत मेघमल्हार' (१९६७), 'रूपरंजनी', 'राणी रूपमती', 'साक्षीदार' (१९६०), 'सुंदरा मनामध्ये भरली', 'संगीत सुवर्णतुला' (१९६०), 'संगीत स्वरसम्राज्ञी' (१९७३) इत्यादी पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांचे लेखन मात्र गांभीर्यापेक्षा रंजकतेकडे अधिक झुकणारे होते. राजकीय लेखनही ते साहित्यिक शैलीने नटवत. लेखन सालंकृत करण्यावर त्यांचा अधिक भर असे.

संस्कृत व उर्दू साहित्याचा त्यांचा चांगला अभ्यास होता. त्यातील वचने व कल्पना ते आपल्या अग्रलेखात वापरत. सरळ, सुबोध अशा त्यांच्या लेखनात विनोदाचा शिडकावाही असे. प्रक्षोभक लिहिण्यापेक्षा मुद्यांकडे, भाषेच्या व शब्दांच्या नेटक्या वापराकडे संपादकाने लक्ष द्यायला हवे, असे त्यांचे मत होते. अशा या प्रतिभावान नाटककाराचे २६ सप्टेंबर १९९६ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!



**सिंधुदुर्ग : महाराष्ट्रातील तळकोकणात दोडामार्ग या ठिकाणी विशिष्ट समाज पारंपरिक व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करीत असल्याचे दृष्य टिपले आहे छायाचित्रकार राधाकृष्ण म्हापसेकर यांनी.**

## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात 'या' पदार्थांमुळे वाढू शकते कोलेस्ट्रॉल

हिवाळा सुरू झाला की आजारांचा धोकाही वाढतो. ज्यांची प्रतिकारशक्ती कमकुवत आहे त्यांना सर्दी, ताप, खोकला यासारख्या विषाणूजन्य संसर्गाचा त्रास सहन करावा लागतो. ज्या लोकांना कोलेस्ट्रॉलची समस्या आहे, त्यांनी हिवाळ्यात आरोग्याकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.निरोगी राहण्यासाठी आपल्या शरीरात चांगले कोलेस्ट्रॉल असणेही गरजेचे आहे. परंतु शरीरातील वाईट कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढल्याने आरोग्याच्या अनेक समस्या उद्‌भवू शकतात. विशेषतः या स्थितीत हृदयाला सर्वात जास्त धोका असतो. (Photos : Freepik)



हिवाळा सुरू झाला की आजारांचा धोकाही वाढतो. ज्यांची प्रतिकारशक्ती कमकुवत आहे त्यांना सर्दी, ताप, खोकला यासारख्या विषाणूजन्य संसर्गाचा त्रास सहन करावा लागतो. ज्या लोकांना कोलेस्ट्रॉलची समस्या आहे, त्यांनी हिवाळ्यात आरोग्याकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. निरोगी राहण्यासाठी आपल्या शरीरात चांगले कोलेस्ट्रॉल असणेही गरजेचे आहे, परंतु शरीरातील वाईट कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढल्याने आरोग्याच्या अनेक समस्या उद्‌भवू शकतात. विशेषतः या स्थितीत हृदयाला सर्वात जास्त धोका असतो.

**गोड पदार्थांपासून लांब रहा** – जर तुम्ही खूप गोड खात असाल, तर कोलेस्ट्रॉलची समस्या जाणवू शकते. थंडीच्या मोसमात लोकांना गाजराचा हलवा, मिठाई किंवा तिळाचे लाडू खायला आवडतात. पण ते जास्त प्रमाणात खाल्ल्याने खराब कोलेस्ट्रॉलची समस्या निर्माण होते.

**फास्ट फूड** – फास्ट फूडची क्रेझ शहरांबरोबरच गावातील लोकांमध्येही वाढताना दिसत आहे. पण ते खायला जेवढे चविष्ट असते, आरोग्यासाठी तेवढेच घातक असते. फास्ट फूडमुळे शरीरातील खराब कोलेस्ट्रॉल वाढते, जे हृदयासाठी खूप धोकादायक आहे.

**सिगारेट आणि दारू** – हिवाळ्यात कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी दारू, सिगारेट यांसारख्या सवयींपासून दूर राहिले पाहिजे. सिगारेट आणि मद्यामुळे आरोग्य तर बिघडतेच, पण कोलेस्ट्रॉलही वाढते.

(या आर्टिकलमध्ये देण्यात आलेली माहिती व उपाय हे सामान्य ज्ञानावर आधारित आहेत. ते अवलंबण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा.)

# रायगडात माझी शाळा, सुंदर शाळा अभियान सुरू




**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यातील शिक्षक, पालक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी यांच्यात शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी, स्पर्धात्मक वातावरणातून विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी प्रेरणादायी वातावरण मिळावे, यासाठी मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा हे अभियान राबविण्याच्या सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत. त्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शाळांमध्ये अभियान राबविण्यास सुरुवात करण्यात आली असून १५ फेब्रुवारीपर्यंत हे अभियान सुरू राहणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभाग शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांनी दिली.

या अभियानासाठी शाळांची अशासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, उर्वरित इतर सर्व व्यवस्थापनांच्या शाळा अशी विभागणी करण्यात आली आहे. प्राथमिकपासून राज्य स्तरापर्यंत प्रत्येक स्तरातील विजेते या दोन्ही वर्गवारीसाठी स्वतंत्रपणे निवडण्यात येणार आहेत. तालुका, जिल्हा तसेच विभागीय पारितोषिके दिली जाणार आहेत.

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या विद्यार्थीकेंद्रित अभियानाचा कालावधी ४५ दिवसांचा आहे. आरोग्य, आर्थिक आणि कौशल्य विकासावर यातून भर दिला जाणार आहे. भौतिक सुविधा पर्यावरण संवर्धन, सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता, शैक्षणिक गुणवत्तेत वाढ व अन्य अभियान उपक्रमातून राबविले जाणार आहे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता विकसित करणे, अध्ययन-अध्यापन आणि प्रशासनात आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन देणे, शिक्षणासाठी पर्यावरणपूरक आणि आनंददायी वातावरण निर्मिती करणे, क्रीडा, आरोग्य वैयक्तिक व परिसर स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी अभियान राबविले जात आहे.

# सोशल मीडियाचा वापर सांभाळून करावा -शितलकुमार राऊत

**खोपोली : प्रतिनिधी**



सध्याचे युग इंटरनेटचे आहे. विद्यार्थ्यांनी एखादी पोस्ट करताना जबाबदारीने करावी, असे आवाहन पोलीस निरीक्षक शितल कुमार राऊत यांनी केले.

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभात विशेष अतिथी म्हणून पोलीस निरीक्षक राऊत बोलत होते. या वेळी प्रमुख पाहुणे उद्योजक मंदार वैद्य, महड देवस्थानच्या कार्याध्यक्ष मोहिनी वैद्य, संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, कार्यवाह किशोर पाटील, उपाध्यक्ष अबू जळगावकर, दिनेश गुरव, नरेंद्र शहा आदींसह संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

मोहिनी वैद्य यांनी, विद्यार्थी व तरुणांनी सोशल मीडियाचा वापर चांगल्या कामासाठीच करावयाचे आवाहन केले. प्रमुख अतिथी उद्योजक मंदार वैद्य यांनी, पालकांनी आपल्या पाल्याला कुठल्या विषयात रस आहे ते ओळखून त्या पद्धतीचे शिक्षण द्यावे, असे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात संस्थेचे कार्यवाह किशोर पाटील यांनी, संस्थेतर्फे दर्जेदार शिक्षण देण्याचा नेहमीच आमचा प्रयत्न राहिल्याचे सांगितले.

प्राचार्य दिशा राणे यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक धर्मेंद्र म्हात्रे यांनी केले. यानंतर पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम झाला. प्रारंभी महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी नृत्याविष्कार सादर केला, आभारप्रदर्शनानंतर कार्यक्रमाची समाप्ती झाली.

## श्री दत्तयाग व लघुरुद्र कार्यक्रम

**मुरुड : प्रतिनिधी**

शहराजवळील उंच टेकडीवर श्रीदत्त मंदिरात श्री दत्तयाग व लघुरुद्र कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवारी (दि. ५) करण्यात आले आहे.

सकाळी ६ वा. पासून श्री दत्त्याग व लघुरुद्र, दुपारी १२ वा. महाआरती, दुपारी १२.३० ते ३ वाजेपर्यंत महाप्रसाद तर सायंकाळी ६ वा. संगीत भजन महोत्सवात गायक रघुनाथ खंडाळकर, लिटील चॅम्प विजेता शुभम खंडाळकर हे असणार आहेत, तर त्यांना तबल्याची साथ सोहम गोराणे, पखवाज साथ साईराज गुरव करणार आहेत. या कार्यक्रमासाठी दत्तभक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन श्रीदत्त देवस्थान ट्रस्ट मंडळ अध्यक्ष प्रमोद भायदे व कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

# आधार कार्ड आणि जात प्रमाणपत्र शिबिराला प्रतिसाद

**चौक : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्यास अभियानांतर्गत खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी पेण शशिकला अहिरराव यांनी चौक मंडळात आधार कार्ड नोंदणी व आधार कार्ड काढणे, आधार कार्ड लिंक करणे याचबरोबर जातीचे प्रमाणपत्र काढण्यासाठी शिबिराचे आयोजन टेंभरी आदिवासीवाडी, फोंडा आदिवासीवाडी व चौक येथे केले होते. या शिबिराला लाभार्थ्यांनी गर्दी केली होती.

या वेळी आधार कार्ड व जातीच्या दाखल्याचे महत्त्व, त्यांची गरज याबाबत माहिती मंडळ अधिकारी किरण पाटील यांनी दिली. त्याचबरोबर योजनांची माहिती देण्यासाठी सूचनाफलक लावले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एकात्मिक आदिवासी प्रकल्प अधिकारी महेंद्र जोराळे, तलाठी अमोल बोराटे, अशोक बनसोडे, मधुसूदन पंपटवार, विठ्ठल मुगदन यांच्यासह कोतवाल मंगेश डुकरे, शंकर होला, मधुकर गुरव, किशोर देशमुख, अपेक्षा यांनी फॉर्म भरण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.




## परिशिष्ट क्र. १६

(उपविधी क्र. ३५ अन्वये )

**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना (मोठ्या प्रमाणामध्ये प्रसारित होणाऱ्या दोन स्थानिक वर्तमान पत्रांमध्ये प्रसिद्धी देण्यात यावी.)**

### नोटीस

सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल, या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत/भूखंडावर / गाळा/ बंगला क्र. ...........धारण करणाऱ्या श्री. विनायक बाळकृष्ण मुळे यांचे तारीख ०३/१२/१९८४ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे दुपारी १२:०० ते दुपारी ४.०० पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : नवीन पनवेल
दिनांक : ०३/०१/२०२४

**सही/-**
**सचिव**
**सरकारी नोकर सहकारी गृह निर्माण संस्था मर्या.**
**सेक्टर २, नवीन पनवेल**



## महानिर्मिती ई-निविदा प्रकाशनाची सूचना

**(०१) निविदा क्रं ३००००४३२२६ बीएम-यू-६,७ (आर) विषय :** वन ईयर एएमसी फॉर द वर्क ऑफ इंसुलेशन फॉर व्हेरीअसवॉल्व्स, पाइप लाइन्स, फरनेस अँड डक्ट्स ईटीसी इन शॉर्ट शट डाउन, अँड रनिंग कंडिशन अॅट यू-६ अँड ७, बीएम-२५० मे.वॅट, टीपीएस परळी वै. **अंदाजीत खर्च** रु.६.०७ लाख, **बयाना :** रु.९५७७/- **(०२) निविदा क्रं ३००००४४३०१ सीएचपी-यू-८ (आर) विषय :** रिवायींडिंग ऑफ एचटी मोटर्स ऑफ सीएचपी यू-८ टीपीएस, परळी-वै ऑन अॅज अँड व्हेन रिक्वायर्ड बेसिस अॅट सीएचपी यूनिट ८,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.२४.५३ लाख, **बयाना :** रु.२८०३५/- **०१ व ०२ साठी ऑनलाइन पद्धतीने निविदा विक्री सुरू होण्याचा/निविदा भरण्याचा अंतिम दि. ०५.०१.२०२४ पासून ११:०० वाजता ते दिनांक १९.०१.२०२४ ते १६:०० वाजता निविदा स्वीकृती आणि उघडणे: दिनांक २०.०१.२०२४ पर्यंत १२:०० पर्यंत आणि १५:०० तासापर्यंत. सर्व निविदांसाठी फि रु. ११८०/- (०३) निविदा क्रं ३००००४२५९४ ईएम-यू-६,७ (आर) विषय :** अॅन्युअल मेंटेनन्स कॉंट्रॅक्ट फॉर बीपीएल मेक टेलीफोन एक्सचेज इंस्टॉल्ड अॅट ईएम यू-६/७,२५०मे.वॅट, टीपीएस परळी वै. **अंदाजीत खर्च** रु.२.८७ लाख, **बयाना :** रु.६३७१/- **(०४) निविदा क्रं ३००००४३९२५ बीएम-यू-६, ७ विषय :** प्रॉक्यूरमेंट ऑफ एलपी पंप्स फॉर कोल मिल बीबीडी ४७७२ अॅट यू-६ अँड ७,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु ७.०३ लाख, **बयाना :** रु.१०५३५/- **(०५) निविदा क्रं ३००००४३३६१ टीएम यू-८ विषय :** वन ईयरअॅन्युअल मेंटेनन्स कॉंट्रॅक्ट ऑफ ओवरहाउलिंग ऑफ मल्टी स्टेज पंप्स इन यू-८ टीएम २५०मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.१.२४ लाख, **बयाना:** रु.३७२३/- **(०६) निविदा क्रं ३००००४४१११ सेफ्टी यू-६, ७ विषय:** सप्लाय अँड इंस्टॉलेशन ऑफ स्पेशल सेफ्टी इमर्जन्सी इन्स्ट्रक्षण बोर्डस अॅट यू-६,७अँड ८ २५० मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.४१.६५ लाख, **बयाना :** रु.४५१५४/- **(०७) निविदा क्रं ३००००४४१३६ ईएम-यू-६, ७ विषय :** एडब्ल्यूसी फॉर कंपलीट रिवायंडिंग ऑफ ४१५ वोल्ट एलटी मोटर्स रेटिंग अप टू १६०केडब्ल्यू अॅट यू-६ अँड ७,२५०मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु ९.५८ लाख, **बयाना:** रु.१३०८९/- **(०८) निविदा क्रं ३००००४४२६४ बीएम-यू-६,७ विषय :** प्रॉक्यूरमेंट ऑफ स्पेअर्स फॉर एचपी अँड बी अँड एस पंप्स ऑफ कोल मिल बीबीडी ४७७२ अॅट यू-६,७,२२५० मे.वॉट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.४२.०५ लाख, **बयाना :** रु.४५५५४/- **(०९) निविदा क्रं ३००००४४३३३ ईएम-यू-८ विषय :** अॅन्युअल वर्क कॉंट्रॅक्ट ऑफ एचटी एलटी केबल लेईग अॅट कॉलनी-ईएम यू-८,२५०मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.१.९५ लाख, **बयाना :** रु.५४५१/- **(१०) निविदा क्रं ३००००४४३४४ बीएम-यू-८ विषय:** प्रॉक्यूरमेंट ऑफ जर्नल असेम्ब्ली शाफ्ट, लोवर जर्नल हाऊसिंग अँड लाईनर्स फॉर कोल मिल एक्सआरपी-९०३ रिक्वायर्ड अॅट बीएम यू-८,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.४०.८४ लाख, **बयाना :** रु.४४३४४/- **(११) निविदा क्रं ३००००४४३६० सिविल-कॉलनी विषय :** अॅन्युअल मेंटेनन्स कॉंट्रॅक्ट ऑफ कारपेंटरी वर्क लाइक डोर्स, शटर्स, शेल्व्स, वॉर्डरोब ईटीसी इन ओल्ड, एबीसी कॉलनी अँड व्हीआयपी चेमरी रेस्ट हाऊस, अॅड्मिन बिल्डिंग अॅट सिविल कॉलनी, परळी वै **अंदाजीत खर्च** रु.१४.२५ लाख, **बयाना :** रु.१७७५५/- **(१२) निविदा क्रं ३००००४४३६६ सीएचपी-यू-६,७ विषय :** टु ईयर वर्क ऑफ प्रोवायडिंग सफीशियंट मॅनपॉवर फॉर सेग्रीगेशन ऑफ बिग साइज कोल लंप्स,फॉरेन मटेरियल अँड ग्रीलिंग फ्रॉम बंकर ग्रिल अॅट सीएचपी (१२००टीपीएच) यू-६ अँड ७,२५०मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.१००.११ लाख, **बयाना :** रु.१०३६१०/- **(१३) निविदा क्रं ३००००४४३७० आय अँड सी यू-८ विषय :** प्रॉक्यूरमेंट ऑफ मॉईस्चर प्रोब फॉर जनरेटर कुलिंग गॅस बाय आय अँड सी यू-८,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.२.०३ लाख, **बयाना :** रु.५५३३/- **(१४) निविदा क्रं ३००००४४३७२ बीएम यू-६, ७ विषय :** सप्लाय ऑफ फ्लूईड कप्लींग एफसीयू-११.५ अँड ओवर रनिंग कल्च अस्ली फॉर एयर प्री हिटर इन यू-६,७,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.५.७९ लाख, **बयाना :** रु.९२९८/- निविदा क्रमांकासाठी ३ ते १४ साठी ऑनलाइन पद्धतीने निविदा विक्री सुरू होण्याचा/निविदा भरण्याचा अंतिम दिनांक: ०५.०१.२०२४ पासून ११.०० वाजता ते दिनांक २५.०१.२०२४ ते १६.०० वाजता निविदा स्वीकृती आणि उघडणे: दिनांक २६.०१.२०२४ पर्यंत १२.०० पर्यंत आणि १५:०० तासापर्यंत. सर्व निविदांसाठी: फि रु ११८०/- संपर्क व्यक्ती: मुख्य अभियंता, टीपीएस परळी-वैजनाथ. मेल आय डि: parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्या: https://eprocurement.mahagenco.in, SRM help desk E-mail ID etendering.prl@mahagenco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक: - ८४११९७१५२५

**मुख्य अभियंता**


# अष्टमी रेल्वे गेटजवळ दुचाकीसाठी पर्यायी मार्ग तयार करावा



## तहसीलदार व पोलिसांना निवेदन

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा रेल्वेस्टेशननजिक असलेल्या रोहा-नागोठणे मार्गावरील अष्टमी येथील रेल्वेफाटक सतत बंद होत असल्यामुळे नागरिकांना त्रास होत आहे. ही समस्या लक्षात घेता, अष्टमी रेल्वे फाटकाला दुचाकीधारकांना जाण्यासाठी पर्यायी मार्ग करावा, अशी मागणी कोळी समाज नेते नवनीत डोलकर यांनी केली आहे.

यासंबंधी निवेदन तहसीलदार किशोर देशमुख यांना ओबीसी जनमोर्चा रायगड जिल्हाध्यक्ष सुरेश मगर, खारगाव ग्रामपंचायत सदस्य विकास पाटील, ओबीसी जनमोर्चा सचिव महादेव सरसंबे यांनी दिले आहे. रोहा पोलिसांनाही निवेदन देण्यात आले आहे.

तहसीलदार किशोर देशमुख यांनी, ठेकेदारांकडून माहिती घेत याबाबत सूचना देतो असे सांगितले. रेल्वेस्टेशननजिक रोहा शहराकडे येणाऱ्या पुणे-वाकण-रोहा-मुरूड मार्गावर अष्टमी येथे रेल्वेफाटक आहे. कोकण रेल्वेमार्गावर सतत गाड्या जा-ये करीत असतात. त्यामुळे सतत फाटक पडत आहे. याचा त्रास कामगारांना व प्रवाशांना होत असतो. या रेल्वेफाटकाला पर्याय म्हणून उड्डाणपूल बांधण्यात येत आहे. गेल्या दोन वर्षांपासून या पुलाचे काम सुरू आहे. या रेल्वे फाटकाजवळ असलेल्या बोगद्यातून पूर्वी दुचाकीचालक जात होते. हा मार्ग पुन्हा सुरू करावा, अशी मागणी कोळी समाज नेते नवनीत डोलकर यांनी केली आहे.

तहसीलदार किशोर देशमुख यांच्या सुचनेनुसार सुरेश मगर, नवनीत डोलकर यांनी अष्टमी रेल्वेफाटकाजवळ जात संबंधीत ठेकेदारांचे प्रतिनिधी अभिषेक यांच्याशी चर्चा करीत जुना मार्ग दाखविण्यात आला.


## पनवेल महानगरपालिका

**शहर अभियंता विभाग**

**जाहीर ई-निविदा सूचना**

निविदा सूचना क्र. पमपा/बांधकाम/४४२३/प्र.क्र.८०/ ४५/२०२४ — दिनांक :- ०३/०१/२०२४

**आयुक्त पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निमशासकीय (Central Government / State Government / Government under taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-२ शतमान पध्दतीनुसार जाहीर ई-निविदा मागवीत आहेत.**

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/254/ 2023-24 | **पनवेल महानगरपालिका मालकीच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये नवीन कार्पेट बसवणे व दुरुस्तीचे काम करणे.** | ३३,२४,०८८/- |

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **दि. ०४/०१/२०२४** रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त- I**
पनवेल महानगरपालिका



## जाहीर नोटीस

मे. ओरिअन ट्रस्ट ११/१२/२०२३ सिडको (नैना) या कार्यालयातून बांधकाम परवानगी मिळाली आहे. सिडको (नैना) च्या निर्देशानुसार जाहीर सुचना देण्यासाठी सामान्य अटींच्या (E) तरतुदीचे पालन करण्यास जाहिर नोटीस देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| जमीन मालकाचे नाव आणि पत्ता | मे. ओरिअन ट्रस्ट<br>रा.१, पर्ल मेंशन (एन), ९१ एम. कर्वे रोड, मरीन लाइन्स, मुंबई-४०००२०. |
| वास्तुविशारदाचे नाव आणि पत्ता | मे. स्पेसएज कंसलटंट (देवयानी खाडिलकर),<br>बी-१०६, नटराज बिल्डींग, शिवसृष्टी कॉम्पलेक्स, मुलुंड गोरेगाव लिंक रोड, मुलुंड (प), मुंबई-४०००८०. |
| स्ट्रक्चरल इंजिनीअरचे नाव व पत्ता | फेम्स कंसल्टींग स्ट्रक्चर इंजिनीअर्स, स्कार्लेट, ५७/बी-२१९, जी-४, चॅपेल रोड, लकी डेकोरेटर्स नंतर, लिलावती हॉस्पीटल जवळ, बांद्रा (प),मुंबई-४०००५०. |
| कंत्राटदाराचे नाव आणि पत्ता | युनिक एंटरप्रायजेस,<br>५८६/ए, गुलटेकडी, अल-अमीन सोसायटी, व्हाइट हाउस बिल्डींग, पुणे-४११०३७. |
| साईट ऑफिसचा पत्ता | गट नं.१५/१/१,१६/१,१७/१,१७/२, १७/३, १७/४, १७/५, १७/६,१८/१/२/अ, १८/१/२/ब, १८/३, १८/४, २०/अ, ३२/अ. ३३/१, ३५/४, ८३/१ आणि ८३/१ मौजे हरिग्राम, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६. |
| बांधकाम परवानगी आदेश क्रं. | CIDCO/NAINA/Panvel/Harigram/BP-00672/cc/2023/0452 दि.११.१२.२०२३ |
| एफ एस आय परवानगी | ०.२ |
| निवासी सदनिकांची संख्या | बंगलो ४, घरे ६, वाणिज्य १६ आणि हॉल ४ |
| मंजुर इमारत आराखडा उपलब्धः- | साईटचा ऑफिस :- गट नं.९९/१, गट नं.९९/२/१, गट नं. ९९/२/२ आणि गट नं.९९/३/१ आकुर्ली, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६. |

**सही/-**
**मे.ओरिअन ट्रस्ट**



राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा



## महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

### निविदा सूचना क्रमांक ११४ सन २०२३-२०२४ (द्वितीय सुचना)

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रा.मा. १९ ते बाली मुळगांव जाधवाडी बारशेत ते इ.जि.मा. १०५. रस्त्याची सुधारणा करणे, तालुका रोहा, जिल्हा रायगड. (५०५४,०४) (द्वितिय सूचना) | ३८०८९०२ | ३९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच व वरील |
| २ | आडी ठाकुरवाडी रोहीणी कोड जोडमार्ग ग्रा. मा. १. चे डांबरीकरण करणे तालुका म्हसळा, जिल्हा रायगड. (कि.मी. ००/०० ते २/००) (द्वितिय सूचना) | ३०३९८४६ | ३१००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच व वरील |
| ३ | रेवेचीवाडी जोडरस्ता तयार करणे, कि. मी. ०/०० ते ०/६०० तालुका रोहा, जिल्हा रायगड. (५०५४,०४) (द्वितिय सूचना) | २४३७०९८ | २५००० | ५९०/ | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ४ | वापबली गुळधे निरंजनवाडी मामवली सा. GO १/०० ते २/०० ग्रा. मा.१८ रस्ता तयार करणे तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड (द्वितिय सुचना) | २२७७३४६ | २३००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ५ | प्रा.रा.मा.५ वरसे रस्त्याची सुधारणा प्रा.जि.मा ४७ कि.मी.०/०० ते ०/५०० रस्त्याची सुधारणा करणे, तालुका रोहा, जिल्हा रायगड. (५०५४.०४) (द्वितिय सुचना) | २०१७३१९ | २१००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ६ | महाड शहर नगरपालिका शाळा नं. १ च्या बाजूला ता. महाड येथे सामाजिक सभागृह बांधणे, तालुका महाड, जिल्हा रायगड (खा. स्था. वि (द्वितिय सुचना) | २०१६५४० | २१००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ७ | मौजे गव्हाडी मुख्या ग्रा.मा. ०४ रस्ता तयार करणं, तालुका महाड, जिल्हा रायगड (द्वितिय सुचना) | २०१०४८२ | २१००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ८ | मौजे राजीवली जोडस्ता ग्रा. मा. २५५ तयार करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड (द्वितिय सुचना) | २०१०४८२ | २१००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ९ | वाकण गावठाण रस्ता ग्रा.मा. २६ मध्ये सुधारणा करणे, तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (द्वितिय सुचना) | १५९२७३० | १६००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच व वरील |
| १० | पाभरे बेटकरवाडी मार्ग ग्रा. मा. ७७ सा. GO. ०/५०० ते १/५०० रस्ता तयार करणे, तालुका म्हसळा, जिल्हा रायगड. (द्वितिय सुचना) | १५३९५४२ | १६००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ११ | मौजे रूपवली ग्रा.पं.रुपवली ता. महाड येथे सामाजिक सभागृह बांधणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (डोंगरी विकास कार्यक्राम २०२२ - २३) (द्वितिय सुचना) | १२२०२५५ | १३००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सहा व वरील |
| १२ | मौजे मोरेवाडी ग्रा.पं. निगडे ता. महाड येथे रस्ता तयार करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (डोंगरी विकास कार्यक्राम २०२२-२३) (द्वितिय सुचना) | १२११८३९ | १३००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सहा व वरील |
| १३ | प्रा.रा.मा.४ ते काळिजे जोडमार्ग सा. GO ०/०० ते ०/५५० ग्रा. मा. ३८ मध्ये रस्ता तयार करणे, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (द्वितिय सुचना) | ११४२१२५ | १२००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सहा व वरील |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०५/०१/२०२४** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **१२/०१/२०२४** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि. **१५/०१/२०२४** वेळ ११.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४१**
**दिनांक : ०३/०१/२०२४.**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

## निवडक

### वृक्षारोपणाने नवीन वर्षाची सुरुवात



**नवी मुंबई :** नववर्षानिमित्त भाजपचे नेरूळ येथील सामाजिक कार्यकर्ते रवी भगत यांनी वृक्षारोपण करून आपल्या वर्षाची सुरुवात केली. मुख्य म्हणजे आपल्या सोबतच्या सहकाऱ्यांनादेखील त्या वृक्षारोपण करण्यास सांगितले. झाडे हे आपल्या निसर्गाचा महत्त्वाचा घटक असून वृक्ष आपल्या निसर्गाची शोभा वाढवतात. समृद्ध व आनंदी जीवनासाठी पर्यावरणाचे रक्षण करणे आवश्यक असून वृक्ष संवर्धन काळाची गरज समजून सकाळी नेरूळ सेक्टर-२८मधील श्री झोटिंगदेव बामनदेव मैदान परिसरात ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आल्याचे रवी भगत म्हणाले.

### महर्षी वि.रा. शिंदे यांना अभिवादन



**गव्हाण :** थोर समाजसुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या पुण्यतिथीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये अभिवादन करण्यात आले. या वेळी विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांच्या हस्ते महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पालक प्रतिनिधी स्मीत मोकल यांच्या हस्ते श्रीफळ वाढवण्यात आला. विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबूलाल पाटोळे, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, शितलकुमार म्हात्रे, राजेंद्र चौधरी, प्रशांत परदेशी, क्रीडा प्रमुख जयराम ठाकूर, सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील आदी उपस्थित होते. इ. आठवीच्या वतीने या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### तळोजा एमआयडीसीत आज प्रदर्शन

**पनवेल :** बँक ऑफ महाराष्ट्र आणि तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने महाएमएसएमई आणि ग्राहक कनेक्ट एक्स्पो २०२४चे आयोजन तळोजा एमआयडीसीमधील हॉटेल तनिश रेसिडेन्सी येथे गुरुवारी (दि.४) करण्यात आले आहे. सूक्ष्म आणि लघु उद्योगांना पाठिंबा देण्यासाठी या एक्स्पोचे आयोजन करण्यात आले आहे. विविध प्रकारचे कर्ज देणे, तत्काळ कर्ज प्रकरणास मंजुरी देणे, आदी सुविधा तत्काळ या एक्स्पोमध्ये उद्योजकांना मिळणार आहेत. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पुणे महाप्रबंधक राजेश कुमार सिंग, तसेच नवी मुंबई उपमहाप्रबंधक व झोनल मॅनेजर संदीप चौरसिया उपस्थित राहणार आहेत.

### लोकशाही दिन ८ जानेवारी रोजी

**नवी मुंबई :** कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवारी (दि. ८) सकाळी १०.३० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, कोकण भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील प्रमुख अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्तांची परवानगी घेणे आवश्यक आहे, असे कोकण विभागाचे उपायुक्त (सामान्य प्रशासन)अजित साखरे यांनी कळविले आहे.

### सेवानिवृत्त शिक्षकाची फसवणूक

**पनवेल :** वेगवेगळ्या एटीएम सेंटरमध्ये जाऊन डेबिट कार्डमधून ५९,१४७ रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी आरोपीविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनोहर नागेश्वर पाटील (रा. सेक्टर १३, नवीन पनवेल) हे सेवानिवृत्त शिक्षक आहेत. ते सेक्टर १९, नवीन पनवेल येथील एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. या वेळी अनोळखी व्यक्तीने हातचलाखीने त्यांचे डेबिट कार्ड स्वतःजवळ ठेवून त्याऐवजी दुसरे बँकेचे डेबिट कार्ड दिले आणि एटीएमचा पिन प्राप्त करून त्यांच्या एसबीआय बँकेच्या डेबिट कार्डमधून वेगवेगळ्या एटीएम सेंटरमधून ५९,१४७ रुपये काढून घेऊन त्यांची फसवणूक केली.

# खारघरच्या हिरानंदानी पुलावरील कोंडी फुटणार

## वाहतूक पोलिसांकडून स्प्रिंग पोस्ट

**पनवेल : वार्ताहर**

खारघर शहरातील हिरानंदानी उड्डाणपुलाजवळील पनवेलकडे जाणाऱ्या लेनवर पालिकेच्या वतीने स्प्रिंग पोस्ट लावण्यात आले आहेत. वाहतूक कोंडी लक्षात घेता स्प्रिंग पोस्टची मागणी केली होती.

खारघर सेक्टर ८, २, तसेच रेल्वे स्थानकाकडे जाताना हिरानंदानी उड्डाणपुलाखालून जावे लागते, सिग्नलमुळे पनवेलकडे जाणाऱ्या वाहनांची कोंडी होती. यांना डाव्या बाजूने थेट सिग्नलचा विनाअडथळा



पनवेलकडे जाता यावे म्हणून खारघर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष काणे यांनी पनवेल या स्प्रिंग पोस्टची मागणी केली होती. त्यानुसार पालिकेने या ठिकाणी स्प्रिंग पोस्ट बसविले आहेत, मात्र काही वाहनचालक अद्यापही स्प्रिंग पोस्ट बसविलेल्या डाव्या बाजूचा रस्ता बंदिस्त करीत असल्याने पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांची कोंडी होत असल्याचे काणे यांनी सांगितले. त्यामुळे हिरानंदानी सिग्नलजवळील पनवेलकडे जाणाऱ्या वाहनांसाठी डाव्या बाजूचा रस्ता मोकळा सोडण्याचे आवाहन खारघर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष काणे यांनी केले आहे.

## ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राचे लोकार्पण



**नवी मुंबई : बातमीदार**

आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबईतील दिवाळे गाव दत्तक घेतले आहे. येथे ज्येष्ठ नागरिकांकरिता तयार केलेल्या विरंगुळा केंद्राचे उद्घाटन पालिकेचे आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते सोमवारी (दि. १) झाले.

आमदार निधीमधून रु. २५ कोटी निधी उपलब्ध करून ज्येष्ठ नागरिकांकरिता विरंगुळा केंद्र उभारण्यात आले आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यासाठी ओपन जिमही निर्माण केली आहे.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे, शहर अभियंता संजय देसाई, उपायुक्त परिमंडळ १ सोमनाथ पोटरे, उपायुक्त परिमंडळ २ डॉ. श्रीराम पवार, कार्यकारी अभियंता अरविंद शिंदे, कार्यकारी अभियंता विद्युत संजीव पाटील, उपकार्यकारी अभियंता अजय पाटील, विकास सोरटे,ज्ञानेश्वर कोळी, संतोष कोळी तसेच असंख्य भाजप पदधिकारी व स्थानिक उपस्थित होते.

## खारघर, तळोजात उद्यापासून २४ तास पाणीपुरवठा बंद

**पनवेल : वार्ताहर**

हेटवणे जलशुद्धी केंद्र आणि जलवाहिनीच्या देखभाल-दुरुस्तीसाठी सिडकोने शुक्रवारी (दि. ५) शटडाउन घोषित केला आहे. त्यामुळे शुक्रवारी सकाळी ९ वाजल्यापासून दुसऱ्या दिवशी म्हणजेच शनिवारी (दि. ६) सकाळी ९ वाजेपर्यंत पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

या २४ तासांच्या शटडाउनमुळे हेटवणे जलवाहिनीवरून पाणीपुरवठा होणाऱ्या सर्व गावांसह द्रोणागिरी, जेएनपीटी, उलवे, खारघर तळोजा या नोडमध्ये पाणीपुरवठा -होणार नाही, असे सिडकोच्या संबंधित विभागाने स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे शनिवारी सकाळी ९ नंतर पुढील २४ तास कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे.

## पनवेल साईनगर येथे मंगल अक्षता कलश यात्रा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री क्षेत्र अयोध्या येथून आलेल्या मंगल अक्षता कलश यात्रा साईनगर परिसरात नववर्षाच्या प्रारंभी सायंकाळी आयोजित करण्यात आली होती. या वेळी मोठ्या संख्येने नागरिकांनी हजेरी लावली होती०

या वेळी ढोल-ताशांच्या गजरात, श्री राम जय राम जय जय राम, जय श्री रामच्या जयघोषात राष्ट्रीय सवयंसेवक संघ कार्यकर्ते, भारतीय जनता पक्ष पदाधिकारी, कार्यकर्त, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरीक तसेच परिसरातील ज्येष्ठ नागरीक, महिला वर्ग, युवक वर्ग, लहान मुले यानी या मंगल कलश यात्रेत भाग घेतला होता. या यात्रेचे साई गणेश मंदिरात स्वागत करण्यात आले.

या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या मंगल अक्षता कलशाचे विधिवत पूजन करण्यात आले. आरती करण्यात आली. उपस्थितांनी या मंगल अक्षदा कलशाचे दर्शन घेतले. साई नगर परिसरातील घरोघरी या मंगल कलशातील अक्षता वाटप अभियान १ ते १५ जानेवारीपर्यंत राबविण्यात येणार असल्याचे संयोजकांनी या वेळी सांगितले.

## गव्हाण विद्यालयात पथक पर्यवेक्षण

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

शासनाच्या शाळा सिद्धीच्या धर्तीवर रयत शिक्षण संस्थेच्या पारंपारिक पथक पर्यवेक्षणानुसार संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये झाले. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य सुधीर घरत, पथक पर्यवेक्षणाचे कार्यकारी प्रमुख बी. ए. मोहिते, सदस्य सर्वश्री ए. बी. वाघ, डी. एम. थोरात, एस. ए. सरकटे, वाय. व्ही. शिर्के, एस. सी. भोसले व व्ही. आर. लेंडवे उपस्थित होते.

या पथक पर्यवेक्षणानिमित्त विद्यालयाच्या रंगनाथ पथकातील सर्व सदस्यांचे विद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. या स्वागत समारंभास विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर, विश्वनाथ कोळी, तसेच विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले व इतर शिक्षक उपस्थित होते. पथकाचे चेअरमन सुधीर घरत, कार्यकारी प्रमुख आणि इतर मान्यवर सदस्यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्याची माहिती विषद करणाऱ्या ओवी गायल्या, तसेच आरोही नाळे हिने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर भाषण केले.

चेअरमन सुधीर घरत यांनी, विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी काही कानमंत्र दिले आणि नववर्षानिमित्त शुभेच्छा दिल्या. पथकातील सदस्य लेंडवे व कार्यकारी प्रमुख बी. ए. मोहिते यांनी आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रियांशू निलेश म्हात्रे याला वाढदिवसानिमित्त भेटवस्तू देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षाला पाटील व सागरकुमार रंधवे यांनी केले, तर प्राचार्य गोवर्धन गोडगे यांनी आभार प्रदर्शन केले.





## लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात विज्ञान प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या नवनवीन विचारांना संधी देण्याच्या उद्देशाने रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयात शालेय विज्ञान प्रदर्शन आणि वैज्ञानिक रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. लहान गट इ. पाचवी ते सातवी आणि मोठा गट इ. आठवी ते दहावी या दोन गटात स्पर्धा घेण्यात आल्या.



विज्ञान प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी आरोग्य, शेती, जीवनमान, वाहतूक व दळणवळण, संगणकीय विचार या विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादर केले, तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या अध्यापनातील भौतिक, रसायन व जीवशास्त्र या पाठातील आकृत्या रांगोळीच्या साहाय्याने काढल्या.

या सर्व गटातून प्रत्येकी तीन क्रमांक काढून विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व भेटवस्तू देऊन विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. टी. चाळके यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे नियोजन विज्ञान विभाग प्रमुख एस. डी. थोरात व सहकारी एस. डी. पाटील, व्ही. व्ही. फडतरे, राहुल चिपळेकर, अनिल पाटील, पेरवी सर यांनी केले.

## मंगल अक्षता कलश यात्रा



**पनवेल : अयोध्या नगरीत प्रभू श्रीरामचंद्रांचे भव्य दिव्य मंदिर साकारत आहे. या मंदिरात २२ जानेवारी रोजी राम मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहे. या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर अयोध्येहून आलेल्या मंगल अक्षता कलश यात्रेचे शहरातील लाईन आळी येथे उत्साहात आगमन आले. या वेळी येथील हनुमान मंदिरात माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. या ठिकाणी त्यांच्यासह परिसरातील केदार भगत, चंद्रकात मजुळे, अभिजित साखरे, अरूणा पाटील, सविता शेडगे, कविता पाटील, मनिषा तुपे, उज्ज्वला गावडे, निता मंजुळे आदी महिला उपस्थित होत्या.**

## जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूलमध्ये आनंद मेळावा



**उरण : बातमीदार**

आत्माराम ठाकूर मिशन संचलित आवरे येथील जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूलमध्ये बाल आनंद मेळावा साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन शिक्षक-पालक संघटनेच्या अध्यक्ष शुभांगी पाटील यांनी केले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष अशोक ठाकूर, शिक्षक-पालक संघटनेचे सदस्य प्रदीप वर्तक, विश्रांती म्हात्रे उपस्थित होते. मेळाव्यात पहिली ते दहावी विद्यार्थ्यांनी एकूण ३० दुकाने मांडली होती. यामध्ये प्रथम क्रमांक दहावीच्या विद्यार्थ्यांनी म्हणजेच गौरी गावंड, मनस्वी गावंड, प्रियांशी म्हात्रे, आर्या गावंड, अनघा पाटील, श्रुती म्हात्रे, सानिया गावंड यांनी पटकावला तसेच द्वितीय इ. दुसरीची विद्यार्थिनी ध्रुवी गावंड, मृणाली म्हात्रे व तृतीय क्रमांक व इयत्ता पाचवीचा विद्यार्थी ध्वेन म्हात्रे यांनी पटकावला. उत्तेजनार्थ क्रमांक शमिका म्हात्रे हिने मिळवला.

मेळाव्यात विविध खेळ घेण्यात आले व इतर विद्यार्थ्यांनी दुकानांमधील पदार्थांचा आस्वाद घेतला. सर्वांचे आभार शाळेच्या मुख्याध्यापिका निकिता म्हात्रे यांनी मानले.

## रजनीश सेठ यांनी स्वीकारला अध्यक्षपदाचा कार्यभार

**नवी मुंबई : बातमीदार**



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदाचा कार्यभार रजनीश सेठ यांनी प्रभारी अध्यक्ष डॉ. दिलीप पांढरपट्टे यांच्याकडून कोकण भवन येथे मंगळवारी (दि. २) स्विकारला. या वेळी त्यांनी गोपनीयतेची शपथ घेतली. आयोगाचे प्रभारी अध्यक्ष डॉ. दिलीप पांढरपट्टे यांनी सेठ यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

या वेळी आयोगाचे सदस्य डॉ. अभय वाघ, डॉ. सतिश देशपांडे, आयोगाच्या सचिव डॉ. सुवर्णा खरात, सहसचिव सुभाष उमराणीकर, सहसचिव सुनील अवताडे, उपसचिव मारुती जाधव, देवेंद्र तावडे, चंद्रशेखर पवार, संजय देशमुख, विपुल पवार, संशोधन अधिकारी राजश्री भिसे आदी उपस्थित होते.

आयोगाच्या सचिव डॉ. सुवर्णा खरात यांनी सेठ यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या रचना व कार्यपद्धतीविषयी संगणकीय सादरीकरणाद्वारे माहिती दिली. ही माहिती समजून घेतल्यानंतर सेठ यांनी आयोगाचा कारभार हा आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करीत अतिशय शिस्तबद्धतेने, पारदर्शकपणे करू, असे आवाहन आयोगाच्या सदस्यांना व इतर अधिकाऱ्यांना केले.

## उरण महाविद्यालयाचे एनएसएस श्रमसंस्कार शिबिर

**उरण : बातमीदार**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पागोटे येथे सात दिवसांचे विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर झाले.



मुंबई विद्यापीठाच्या निर्देशानुसार युवकांचा ध्यास ग्राम, शहर विकास अंतर्गत लोकसंख्या नियंत्रण जनजागृती या थीमवर आधारित या शिबिराचे उद्घाटन मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा. डॉ. सुशील शिंदे यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड, सरपंच कुणाल पाटील, ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष प्रकाश नारायण भोईर, उपसरपंच सतीश ज्ञानेश्वर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिरामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन केले गेले. यामध्ये ग्रामस्वच्छता, आरोग्यविषयक जनजागृती व लोकसंख्या नियंत्रण जनजागृती याविषयी विशेष भर देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये शिस्त, आरोग्याच्या संदर्भात जागृती, नेतृत्व विकास कौशल्य, संवाद कौशल्य, संघटन कौशल्य आदी विविध गुणांचा विकास करण्याच्या अनुषंगाने हे विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर अत्यंत मोलाचे ठरले.

शिबिराच्या समारोप कार्यक्रमात पूजा पाटील, वैष्णवी पाटील व शैलेश खंदारे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. योगा, श्रमदान व दुपारच्या बौद्धिक सत्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कार रुजवण्याचे कार्य या शिबिराच्या माध्यमातून करण्यात आले. विद्यार्थ्यांसोबत राष्ट्रीय योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे, सह कार्यक्रम अधिकारी अनुपमा कांबळे, विनिता तांडेल, पूजा गुप्ता व सदा लेंडी यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

# रोहा पं.स.इमारत खिळखिळी

## पिलरला तडे, भिंती खचल्या, स्लॅबच्या सळ्या गंजल्या





(छाया : जितेंद्र जाधव)

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्याची प्रशासकीय कार्यालय असणारी पंचायत समितीची इमारत खिळखिळी झाली आहे. येथे पिलरला तडे गेले असून भिंतीही खचू लागल्या आहेत. ठिकठिकाणी स्लॅबचे काँक्रीट पडून त्यातून गंजलेल्या सळ्या बाहेर आल्या आहेत.

दुरुस्तीकडे अधिकाऱ्यांचे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याने जेमतेम ३० वर्षांतच इमारत 'डेजर झोन' बनली आहे. त्यामुळे विविध कामांसाठी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसह अधिकारी व कर्मचाऱ्यांचा जीवही धोक्यात आला आहे. १९९३मध्ये अनावरण झालेल्या या इमारतीला भेगा पडल्या असल्याने भीतीचे वातावरण आहे. इमारतीत तळमजल्यावर मिटिंग हॉल तसेच पहिल्या मजल्यावर सर्वांत जास्त वर्दळीचे महिला व बालकल्याण विभाग आणि आरोग्य विभागाची कार्यालये आहेत. या सर्व कार्यालयांतून रोजच्या कामकाजासाठी येणाऱ्या अंगणवाडीसेविकांची आणि नागरिकांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी केलेल्या जिन्याच्या आरसीसी कामाची स्थिती दयनीय असल्याने कर्मचारी काम करायला घाबरत आहेत.

**दुरुस्ती करण्याची गरज**

या इमारतीचे शास्त्रीय पद्धतीने डागडुजी करण्यासाठी मान्यताप्राप्त संस्थेकडून लवकरात लवकर स्ट्रक्चरल ऑडिट होणे गरजेचे आहे, मात्र याकडे दुर्लक्ष झाले आहे. स्लॅब कधीही कोसळेल या धास्तीने जीव मुठीत घेऊन कर्मचारी काम करत आहेत. तातडीने हे कार्यालय अन्यत्र हलवावे, अशी मागणी होत आहे.

# नेरळमध्ये एका रात्रीत पाच दुकाने फोडली

## हजारो रुपयांचा माल चोरला



(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ शहरात एका रात्रीत अज्ञातांनी पाच दुकाने फोडली असून हजारो रुपयांचा माल या चोरांनी चोरून नेला. मुख्य बाजारपेठेच्या केंद्रस्थानी असलेल्या अंबिका नाका येथील किराणा व मोबाईल दुकान फोडल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

नेरळ शहर गेल्या काही महिन्यांपासून चोरांनी लक्ष्य केले आहे. बंद घर फोडणे, व्यापारीवर्गाची बंद दुकाने फोडून सामानाची नासाडी, गल्ल्यातील रक्कम पळवून नेणे या घटना घडत असतानाच सन २०२४च्या स्वागतालाच चोरांनी पुन्हा एकदा नेरळ शहरात धुमाकूळ माजवला आहे. २ जानेवारीला पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी मुख्य बाजारपेठ येथील अंबिका नाका म्हणून प्रसिद्ध अशा परिसरातील मनोहरलाल सुनील कुमार किराणा स्टोअर्स, जय गजानन किराणा स्टोअर्स, एम. डी. कोठारी किराणा मालाचे दुकान तसेच अंबिका भुवन हॉटेल आणि ओम बन्ना मोबाईल शॉप ही दुकाने फोडून त्यातील माल व काही रक्कम चोरली. मोबाईल दुकानात दुरुस्तीसाठी आलेले ग्राहकांचे महागडे फोनही चोरांनी चोरून नेले. मोबाईल शॉप व किराणा दुकानांतील चिल्लर असा एकत्रित सुमारे ८० हजार रुपयांचा मुद्देमाल या अज्ञात चोरट्यांनी नेला.

दरम्यान, दुकानमालक दुकान उघडण्यासाठी सकाळी हजार झाले असता ही घटना उघडकीस आली असून याबाबत नेरळ पोलिसांना माहिती देण्यात आली. या प्रकरणी तपास सुरू आहे.

# लोणेरे येथील 'शासन आपल्या दारी'ची जोरदार तयारी

## आमदार भरत गोगावलेंकडून कार्यक्रमस्थळाची पाहणी

**माणगाव : प्रतिनिधी**

लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या भव्य पटांगणावर ५ जानेवारी रोजी शासन आपल्या दारी हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमस्थळाची आमदार भरत गोगावले यांनी पाहणी करून अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

कार्यक्रमास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्यासह विविध खात्याचे मंत्री तसेच वरिष्ठ शासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. यासाठी लोणेरे येथील मैदानावर सुमारे १२ एकर जागेत मंडप, २५ एकर जमिनीवर लाभार्थींना बसण्यासाठी व फास्ट फुड खाण्यासाठी तसेच येणाऱ्या वाहनांना पार्किंगची व्यवस्था केली जात असून ४० एकरवर भव्य तीन मंडप उभारले जात आहेत. व्हीआयपी, मान्यवरांच्या वाहनांना स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था त्याचबरोबर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी स्वतंत्र दोन हॅलिपॅड उतरण्यासाठी व्यवस्था करण्याचे काम चालू आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे वाहनाने येणार आहेत.

कार्यक्रम असल्याने त्याचे नियोजन जिल्हाधिकारी योगेश म्हसे करीत असून त्यांच्या अखत्यारित विविध समित्या काम करीत आहेत. रायगड जिल्ह्यातून ७५ हजार लाभार्थी या वेळी उपस्थित राहणार असून यासाठी सर्व स्तरातून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

आमदार गोगावले यांच्यासोबत पाहणीवेळी शिवसेनेचे दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, संपर्कप्रमुख अरुण चाळके, युवसेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, माजी सभापती महेंद्र तेटगुरे, विभाग प्रमुख रवी टेंबे, उपतालुकाप्रमुख नितीन पवार, युवसेना तालुकाप्रमुख राजेश कदम, युवसेना महाड विधानसभा अध्यक्ष वैभव मोरे, युवा नेते अनिकेत घोसाळकर तसेच विविध खात्याचे शासकीय अधिकारी, ठेकेदार आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व लाभार्थ्यांना शासनाच्या योजनेचा जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यासाठी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन आमदार गोगावले यांनी केले आहे.



(छाया : सलीम शेख)

# क्रांतिज्योती सावित्रीबाईंचे स्मरण करणे आमचे कर्तव्य

## भाजप जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे यांचे उद्गार



(छाया : श्यामकांत नेरपगार)

**नागोठणे : बातमीदार**

आम्ही महिला आज सुशिक्षित आहोत ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्यामुळे. म्हणून जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण करणे हे आमचे कर्तव्य आहे, असे उदगार भाजप जिल्हा उपाध्यक्षा श्रेया कुंटे यांनी काढले.

थोर समाजसुधारक क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १९३वी जयंती भाजपच्या नागोठणे येथील कार्यालयात साजरी करण्यात आली. त्या वेळी कुंटे बोलत होत्या.

या कार्यक्रमास भाजपचे माजी जिल्हा उपाध्यक्ष किशोर म्हात्रे, रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, एकनाथ ठाकूर, नागोठणे शहराध्यक्ष सचिन मोदी, अपर्णा सुटे, प्रियांका पिंपळे, शीतल नांगरे, शामकांत नेरपगार, विवेक रावकर, अंकुश सुटे, रउफ कडवेकर, शेखर गोळे, अशोक अहिरे, धनराज उमाळे, तिरत पोलसानी, पांडुरंग जाधव, जानू हंबीर, विहार हेंडे, केतन कोपळकर आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

कुंटे पुढे म्हणाल्या की, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिलांना शिक्षण मिळावे यासाठी कठोर परिश्रम घेतले. महिलावर्गाच्या अनेक समस्या सोडविल्या. त्यांनी आम्हाला पुढे जाण्याची संधी उपलब्ध करून दिली. समाजाच्या विरोधात जाऊन महिलांना शिक्षणासाठी प्रवृत्त केले. त्यांचे कार्य महान आहे.

# नागोठण्यात महिलांच्या क्लासेसचे उद्घाटन

**नागोठणे : बातमीदार**

नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच नागोठणे येथे त्रिमूर्ती हॉबी क्लासेसच्या महिलांसाठी शिका आणि कमवा या धर्तीवर आरी व हॅण्ड वर्कचे प्रशिक्षण सुरू करण्यात आले असून या क्लासेसचे उद्घाटन सरपंच सुप्रिया महाडिक यांच्या हस्ते करण्यात आले.




या कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य सुप्रिया काकडे, भाविका गिजे, भाजपच्या सोनी पांडे यांच्यासह बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.

दरम्यान, भाजपच्या जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, शितल नांगरे, प्रियांका पिंपळे यांनी त्रिमूर्ती हॉबी क्लासेसच्या महिलांना शिका आणि कमवा या धर्तीवर व्यवसाय करता यावा यासाठी विशेष नियोजन केले. त्यांनी भेट देऊन महिलांना शुभेच्छा दिल्या.

अप्रतिम, सुंदर आरी वर्क व हॅण्डवर्क प्रशिक्षण देण्यासाठी सौंदर्य स्पर्श ब्युटी पार्लर, पुणे येथून वनिता किरवे आल्या आहेत. त्या १ ते १५ जानेवारीपर्यंत असे १५ दिवसांचे प्रशिक्षण देणार असल्याची माहिती श्रेया कुंटे यांनी दिली. त्रिमूर्ती हॉबी क्लासेस नागोठणेला भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशिल पाटील, माजी सरपंच विलास चौलकर, भाजप प्रदेश सदस्य राजेश मपारा, पेण सुधागड विधानसभा निवडणूक प्रमुख प्रसाद भोईर, जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर, रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, एकनाथ ठाकूर, तिरत पोलसानी, राजन दुबे, धनराज उमाळे, केदार कुंटे, संजय नांगरे यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

# हुतात्मा भाई कोतवाल यांना अभिवादन



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील मध्यवर्ती असलेल्या कोतवाल नगरमध्ये ८१व्या हुतात्मा दिनी हुतात्मा भाई कोतवालांना अभिवादन करण्यात आले. या वेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

कोतवाल नगरमधील उद्यानात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कोतवाल नगर रहिवासी संघाचे अध्यक्ष शिवाजी भासे यांच्या हस्ते भाई कोतवाल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर उपस्थित नगरवासीयांनीही अभिवादन केले.

या कार्यक्रमास माजी उपनगराध्यक्ष रामकृष्ण मोकल, नगरसेवक हेमंत ठाणगे, प्रशांत सानप, निलेश शिंदे, अभिजीत पवार, संतोष भासे, पंकज पाटील, अॅड. गोपाळ शेळके, अॅड. संतोष जोहेकर, सुहास प्रधान, मंगेश हगवणे, विजय बेडेकर, तुषार दिवेकर, अरुण मालुसरे, सुरेखा प्रधान आदी उपस्थित होते.



**खोपोली : केएमसी कॉलेज, ५ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन एनसीसी मुंबई ग्रुप अ यांच्या वतीने कॉलेजच्या एनसीसी ऑफिसमध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. लेफ्टनंट शितल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाला एनसीसी कॅडेट उपस्थित होते. त्यांनी सावित्रीबाईंबद्दल विचार व्यक्त केले.**

# अंगणवाडी सेविकांचे पं.स.मध्ये निवेदन

**महाड** : आपल्या विविध मागण्यांसह मानधनात वाढ करण्यासाठी महाड तालुक्यातील अंगणवाडी सेविकांनी पंचायत समितीमध्ये निवेदन सादर केले. या वेळी तालुक्यातील विविध संघटनांच्या अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.

राज्यभरातील अंगणवाडी सेविका ४ डिसेंबरपासून बेमुदत संपावर आहेत. यामुळे तालुक्यातील अंगणवाड्या बंद आहेत. अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधन वाढ, शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळावा, पेन्शन, ग्रॅज्युटी, आदी त्यांच्या मागण्या आहेत. याकरिता महाराष्ट्र राज्य अंगणवाडी संघटनेच्या माध्यमातून महाड पंचायत समितीमध्ये एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले, अशी माहिती स्नेहा चंद्रकांत घोलप यांनी दिली.

# वडघर (मुद्रे) हायस्कूलचे स्नेहसंमेलन



**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित सरस्वती विद्या मंदिर वडघर (मुद्रे) तथा कै. शंकर सीताराम देशमुख विद्या संकुल या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच उत्साहात झाले. या वेळी विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले.

अॅड. केदार गांधी व शाळेचा माजी विद्यार्थी रोहित पारधे, शाळा समिती निमंत्रित सदस्य बाबाजी रिकामे, मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्षे पूर्ण झाल्याने त्यांच्या पराक्रमाची व शौर्याची गाथा केंद्र मानून विद्यार्थ्यांना काढलेल्या रांगोळी व हस्तकला दालनाचे तसेच तयार केलेल्या शिवतेज या हस्तलिखिताचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी मान्यवरांनी शाळेचा परिसर, गुणवत्ता, विद्यार्थ्यांची कल्पकता, शिस्त, शिक्षण व संस्कराचे महत्त्व, पालकांचे सहकार्य, खेळातील प्राविण्य याचे कौतुक केले तसेच शाळेच्या मैदानाचे सपाटीकरण व अर्थिकदुष्टचा कमकुवत विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठीचा खर्च करण्याचे आश्वासन दिले.

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. माता-भगिनींसाठी हळदी कुंकूचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी सुप्त कला गुणांना वाव देत विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर केले.

यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, पराक्रम असे पोवाडे, रेकॉर्ड डान्स, समाजप्रबोधनपर नाटिका यांचा समावेश होता.

कार्यक्रमास मांजरवणे उपसरपंच बाळाराम कर्जावकर, सदस्य अस्मिता तटकरे आदी उपस्थित होते. शाळेचे सांस्कृतिक प्रमुख राजन पाटील, विद्या शिर्के, सुनील कालगुडे यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मेहनतीने हा कार्यक्रम यशस्वी झाला.

# द. आफ्रिका ५५ धावांत गारद

## भारताचा पहिला डावही १५३ धावांमध्ये संपुष्टात

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिका आणि भारत यांच्यात सुरू झालेल्या दुसऱ्या कसोटीत मोहम्मद सिराजने दुसऱ्या कसोटीचे पहिले सत्र गाजवले. त्याने पहिल्या स्पेलमध्ये ९-३-१५-६ अशी भन्नाट गोलंदाजी करून दक्षिण आफ्रिकेला शरणागती पत्करण्यास भाग पाडले. त्याला जसप्रीत बुमराह व मुकेश कुमार यांची मिळालेली साथ अप्रतिम होती. त्यामुळे यजमानांचा पहिला डाव अवघ्या ५५ धावांवर संपुष्टात आला. भारताविरुद्धची कोणत्याही संघाची कसोटीतील ही सर्वांत निचांकी कामगिरी ठरली. यानंतर भारताचाही पहिला डाव १५३ धावांमध्ये संपुष्टात आला. मग पुन्हा आफ्रिकन संघ फलंदाजीसाठी मैदानात आला.



सिराजने चौथ्या षटकात एडन मार्करमला (२) झेलबाद करून माघारी पाठवले. कर्णधार डीन एल्गार (४) याचाही सिराजने त्रिफळा उडवला. आफ्रिकेला बसलेला हा खूप मोठा धक्का होता. टॉनी डे जॉर्जी (२) व पदार्पणवीर त्रिस्तान स्टब्स (३) हेही फार काही करू शकले नाही. बुमराहने नवव्या षटकात स्टब्सला बाद केले, तर सिराजने जॉर्जीचा अडथळा दूर केला. सिराज एक्स्प्रेस इथेच थांबली नाही आणि त्याने डेव्हिड बेडिंगहॅम (१२) व मार्को यानसेन (०) यांचा अडथळा दूर करताना आफ्रिकेची अवस्था ६ बाद ३४ अशी केली. त्यात कायले वेरेयने (१५) याच्या विकेटची भर पडली. सिराजने त्याच्या ८.५ षटकांत १५ धावा देताना सहा विकेट्स घेतल्या. ही त्याची सर्वोत्तम वैयक्तिक कामगिरी ठरली.

मुकेश कुमारने त्याच्या पहिल्या षटकात आफ्रिकेला धक्का देताना केशव महाराजला (३) बाद केले. बुमरानेही सामन्यातील दुसरी विकेट घेतली आणि नांद्रे बर्गरचा (४) बळी घेताना आफ्रिकेला नववा धक्का दिला. मुकेशने सान्यातील दुसरी विकेट घेऊन आफ्रिकेला ५५ धावांवर गारद केले.

### मोहम्मद सिराजची भेदक गोलंदाजी

*भारताच्या मोहम्मद सिराजने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीतील पहिल्या डावात काईल व्हेरिनला बाद करून आपली सहावी विकेट घेतली. सिराजने अवघ्या नऊ षटकांत १५ धावा देत सहा विकेट्स घेतल्या आहेत. त्याची कसोटी क्रिकेटमधील ही सर्वोत्कृष्ट गोलंदाजी आहे. दक्षिण आफ्रिकेत कसोटी सामन्याच्या एका डावात सहा किंवा त्याहून अधिक विकेट घेणारा तो चौथा भारतीय गोलंदाज ठरला आहे. त्याच्याआधी हरभजन सिंग आणि रविचंद्रन अश्विन यांनी दोनदा प्रत्येकी सात विकेट घेतल्या होत्या, तर शार्दुल ठाकूरनेही एकदा सात विकेट्स घेतलेल्या आहेत.*



# अलिबाग-मुरूडच्या कराटेपटूंनी जिंकला इंटरनॅशनल केईबुकाई कप

**मुरूड : प्रतिनिधी**

कराटे डू असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबईत इंटरनॅशनल केईबुकाई कप कराटे चॅम्पियनशिप २०२३ स्पर्धा झाली. या स्पर्धेत अलिबाग-मुरूडमधील कराटेपटूंनी दिमाखदार कामगिरी दर्शवत सहा सुवर्ण, १५ रौप्य व १४ कांस्यपदके पटकावून अत्यंत मानाच्या आंतरराष्ट्रीय चषकावर आपले नाव कोरले

अलिबागचे कराटे प्रशिक्षक क्योशी राहुल तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली २२ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. स्पर्धेसाठी जपान येथून हांशी साटो व त्यांचा संघ उपस्थित होता. अलिबाग-मुरूडमधील कराटेपटूंनी एकूण ३५ पदके जिंकून इंटरनॅशनल केईबुकाई कप पटकाविला. यामध्ये काता व कुमिते प्रकारात रज्जाक मुजावरने दोन सुवर्ण, साईशा मुंबईकर, प्रिया देशमाने एक सुवर्ण व एक रौप्य, मिहीर वर्तक एक सुवर्ण व एक कांस्य, आरोही जगे एक सुवर्ण, मुमूक्षा घरत, आदित्य चोरघे, नृपाल पाटील दोन रौप्य, हर्ष कालेल, सार्थक मोरे, आश्मित थळे एक रौप्य व एक कांस्य, तहा गोंडेकर, सिद्धेश यादव, मद्यान कडीरी, तनिष्क तावडे एक रौप्य, श्रीयांस तावडे, प्रिन्स पाटील, सूर्यवीर चौधरी, मोक्षदा पाटील दोन कांस्य आणि इशिता मांडवकर, कार्तिक गावंड, वरद देशमाने यांनी कांस्यपदक प्राप्त केले. या सर्वांचे कौतुक अन् अभिनंदन होत आहे.

# क्रिकेट स्पर्धेत प्रतिक अकॅडमी प्रथम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चेंबूर बीएआरसी येथे झालेल्या पहिल्या एएसएमएससी-१२ क्रिकेट स्पर्धेत पनवेलच्या प्रतिक क्रिकेट अकॅडमी संघाने विजेतेपद प्राप्त केले. अणुशक्तीनगर येथे झालेल्या या स्पर्धेत मुंबई विभागातील नामांकित १२ संघांनी सहभाग घेतला होता.

प्रतिक अकॅडमीने उपांत्य फेरीत अचिव्हर्स रेड या नावाजलेल्या संघाविरुद्ध सहज विजय संपादन केल्यावर अंतिम सामना वेंगसकर अकॅडमी या मातब्बर संघासोबत होता. प्रथम फलंदाजी करताना प्रतिक अकॅडमीने २५ षटकांमध्ये १७७ ठोकल्या आणि वेंगसकर अकॅडमीला अवघ्या ११४ धावांमधे रोखून अंतिम सामना एकहाती जिंकला.

संपूर्ण स्पर्धेत ओंकार राक्षिकर, वेदांत बोंबले, श्रेय पाटील, तनिशा शर्मा, विघ्नेश पाटील, आर्य म्हात्रे यांनी फलदांजीत; तर अर्णव साळवी, स्वरा जगताप, ईशान पाठक, पार्थ जंगम, आर्य लाड, आयुष वधे, भूषण सावंत यांनी गोलंदाजीत दमदार कामगिरी केली.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास भारतीय संघाचा स्टार फलंदाज सूर्यकुमार यादवचे वडील अशोक यादव उपस्थित होते. विशेष म्हणजे याच मैदानावर सूर्यकुमार हा लहानपणापासून खेळला आणि घडला. मुंबई विभागातील मातब्बर खेळांडूविरुद्ध पनवेलच्या संघाचा भीमपराक्रम बघून प्रशिक्षक प्रतिक मोहिते आणि खेळाडूंचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

# फंटूष इलेव्हन संघ एमपीएलचा विजेता

## दीप पाटील ठरला मालिकावीर



**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील मोठी जुई प्रीमियर लीग (एमपीएल) २०२३च्या तिसऱ्या पर्वाचे आयोजन मी मराठी ग्रुपने केले होते. पाच दिवस रंगलेल्या या स्पर्धेत विलास कामोठकर यांचा फंटूष इलेव्हन क्रिकेट संघाने विजेतेपद पटकाविले. रमाकांत पाटील यांचा अक्कादेवी चॅम्पियन संघ उपविजेता ठरला. स्पर्धेत दीप भरत पाटील ठरला याने मालिकावीराचा किताब आपल्या नावे केला.

स्पर्धेत मोठी जुई गावातील १६ संघांनी सहभाग नोंदवून लिलाव बोली स्वरूपात खेळाडूंना संघमालकांनी खरेदी केले होते. या स्पर्धेसाठी अनुक्रमे पहिले चार क्रमांक आणि उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक यांच्यासाठी स्मार्टसिटी डेव्हलपर्सचे मालक प्रवीण घासे यांच्याकडून आकर्षक चषक देण्यात आले होते, तर मालिकावीरसाठी सरपंच दीपक भोईर यांच्याकडून होंडा कंपनीची बाईक देण्यात आली होती.

अटीतटीच्या झालेल्या सामन्यात अक्कादेवी संघावर मात करीत फंटूष इलेव्हन क्रिकेट संघाने विजेतेपद जिंकले. तृतीय क्रमांक निखिल भोपी यांचा शिवराजे प्रतिष्ठान संघ, तर चतुर्थ क्रमांक प्रशांत पाटील यांचा शिवाज्ञा संघाने मिळविले. दीप पाटील मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज यश भोपी, उत्कृष्ट गोलंदाज विनेश कोळी व उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून शुभम पाटील मानकरी ठरला. विजेते संघ आणि वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

मोठी जुई येथील आक्कादेवी मैदानावर झालेल्या एमपीएलसाठी वसंत भोईर, रमेश पाटील, यशवंत पंडित यांचे मी मराठी ग्रुपला सहकार्य लाभले.

# केपटाऊनमध्येही वाजले राम सिया राम गाणे

## विराटने जोडले हात, व्हिडीओ व्हायरल

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील शेवटच्या सामन्याला बुधवारी केपटाऊनमध्ये सुरुवात झाली. आफ्रिकन संघाच्या डावादरम्यान भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीची अनोखी शैली पहायला मिळाली.

दक्षिण आफ्रिकेचा केशव महाराज फलंदाजीसाठी आला, तेव्हा स्टेडियममध्ये उपस्थित असलेल्या डीजेने आदिपुरुष चित्रपटातील राम सिया राम हे गाणे वाजवले. हे पाहून विराट खूश झाला. त्याने हात जोडले आणि भगवान श्री राम यांच्यासारखे धनुष्य चालवण्याचे हावभाव केले. हे पाहून स्टेडियममध्ये बसलेले चाहते आनंदी झाले. विराटची ही शैली लोकांना खूप आवडली आणि त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.



याआधीही केशव महाराज जेव्हा-जेव्हा फलंदाजीला आला आहे, तेव्हा हे गाणे वाजवण्यात आले. भारताविरुद्धच्या तिसऱ्या आणि शेवटच्या एकदिवसीय सामन्यादरम्यान महाराज फलंदाजीला आला, तेव्हा पर्लमध्ये 'राम सिया राम' हे गाणे वाजले होते. तेव्हा केएल राहुलने केशवला याबद्दल विचारणाही केली होती.

# डेव्हिड वॉर्नरला गार्ड ऑफ ऑनर



**सिडनी : वृत्तसंस्था**

जगातील सर्वोत्तम सलामीवीर फलंदाजांपैकी एक डेव्हिड वॉर्नर सिडनी येथे पाकिस्तानविरुद्ध त्याच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीतील शेवटचा कसोटी सामना खेळत आहे. या सामन्यानंतर वॉर्नर पांढऱ्या जर्सीत ऑस्ट्रेलियाकडून खेळताना दिसणार नाही. त्यामुळे या सामन्यात डेव्हिड वार्नर फलंदाजी आला, तेव्हा पाकिस्तानचे सर्व खेळाडू दोन रांगेत उभे राहिले आणि त्याला गार्ड ऑफ ऑनर दिला.

सिडनी कसोटी सामन्यापूर्वी १ जानेवारी रोजी, वॉर्नरने त्याच्या एकदिवसीय क्रिकेट कारकिर्दीतून निवृत्तीची घोषणा केली होती, मात्र तो टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणे सुरू ठेवेल. सिडनी कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात डेव्हिड वॉर्नर फलंदाजीसाठी मैदानात आला तेव्हा पाकिस्तान संघाचा कर्णधार शान मसूदने संघसहकाऱ्यांसह त्याला गार्ड ऑफ ऑनर दिला. याचा व्हिडीओ क्रिकेट डॉट कॉम एयूने एक्सवर शेअर केला आहे.















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com